दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२२३ | मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

संपादकीय....

खुर्च्या मोजणाऱ्यांची नजर आणि देशाचे प्रश्न : उत्तरदायित्व कुणाचे?

देशात सगळं काही आलबेल असल्याचा आभास निर्माण केला जात आहे! बेरोजगारीचा प्रश्न नाही, महागाईचे संकट नाही, शेतकऱ्यांच्या व्यथा नाहीत, सीमेवर चीनच्या हालचालींची चिंता नाही आणि निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्हच नाही! जर सगळंच सुजलाम सुफलाम असेल, तर मग सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी करायचं तरी काय? अशा वेळी विरोधकांच्या, विशेषतः राहुल गांधींच्या सभेत किती लोक आले, किती खुर्च्या रिकाम्या राहिल्या आणि किती जण सभेतून निघून गेले, याची मोजदाद करण्यातच आपली ऊर्जा खर्च करणे, हेच सध्याच्या राजकीय संस्कृतीचे वास्तव बनले आहे.

थोडक्यात...

आघाडीच्या रॅलीमुळे कोट्यावधींचे नुकसान

दिल्ली: दिल्लीतील रामलीला मैदानावर रविवारी (दि. १ नोव्हेंबर) निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि 'एसआयआर'विरोधात 'इंडिया' आघाडीच्या वतीने महारॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमुळे निर्माण झालेल्या अडथळ्यांमुळे दिल्लीतील २० ते २५ प्रमुख बाजारपेठांमधील सुमारे २.५ लाख दुकाने बंद राहिली. व्यापाऱ्यांच्या मते, यामुळे त्यांना १०,००० ते ११,००० कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागले, असा आरोप 'चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्री'ने केला आहे. अध्यक्ष ब्रिजेश गोयल यांनी सांगितले की, रॅलीच्या ठिकाणाजवळील बाजारपेठारांमधील सुमारे ३ लाख दुकानांपैकी ८०% दुकाने बंद होती. वाहतुकीवरील निर्बंध, गर्दी आणि मोठ्या संख्येने लोक येण्याची शक्यता असल्याने व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवणे पसंत केले. या गोंधळामुळे राष्ट्रीय राजधानीच्या आसपासच्या शहरांतून येणारे ग्राहक, पुरवठादार आणि विक्रेते यांच्या येण्या-जाण्यावरही परिणाम झाला.

५ राज्यांतील मतदार संख्येत १३.२४ टक्क्यांची घट

दिल्ली: मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकन अर्थात एसआयआर प्रक्रियेनंतर उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गोवा, पंजाब आणि मणिपूर या राज्यांमधील मतदार संख्येत १३.२४ टक्क्यांपर्यंत घट झाली आहे, अशी माहिती निवडणूक आयोगाकडून देण्यात आली आहे. या पाचही राज्यांत पुढील वर्षाच्या सुरुवातीला विधानसभा निवडणुका होणार आहेत. निवडणूक आयोग आणि संबंधित राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी अलीकडेच जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, या पाच राज्यांत एसआयआर प्रक्रियेनंतर एकूण मतदार संख्या सुमारे १८.७१ कोटींवरून १६.४३ कोटींवर आली आहे. म्हणजेच, यात सुमारे २.२९ कोटी मतदार वगळण्यात आले आहेत. या पाच राज्यांपैकी सर्वाधिक मतदार संख्या असलेल्या उत्तर प्रदेशात ही घट सर्वाधिक, म्हणजेच एकूण घटीच्या सुमारे ९० टक्के इतकी आहे. उत्तर प्रदेशात दुसऱ्या टप्प्यात एसआयआर प्रक्रिया राबवण्यात आल्यानंतर मतदारांची संख्या १५.४४ कोटीवरून १२.५६ कोटींवर आली. तसेच अंतिम मतदार यादीत १३.४० कोटी इतकी संख्या नोंदवली गेली. उत्तर प्रदेशात सुमारे २.०४ कोटींची निव्वळ घट झाली, जी १३.२४ टक्के इतकी असून पाच राज्यांपैकी सर्वाधिक आहे.

जीएसटी संकलनात २३ टक्क्यांची घसघशीत वाढ!

नवी दिल्ली: यंदाच्या ऑक्टोबर महिन्यात सरकारी खजिन्यात जीएसटीच्या माध्यमातून मोठी भर पडल्याचे समोर आले आहे. १ नोव्हेंबर रोजी जाहीर झालेल्या ताज्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर २०२६ मध्ये देशाचे एकूण जीएसटी संकलन २.३१ लाख कोटी रुपयांवर पोहोचले. गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरच्या तुलनेत यात तब्बल २३ टक्क्यांची वाढ झाली आहे. गेल्या चार वर्षांतील जीएसटी संकलनातील ही सर्वाधिक वेगवान वाढ आहे. विशेष म्हणजे, सलग चौथ्या महिन्यात केंद्र सरकारला दोन लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक जीएसटी महसूल मिळाला आहे. सप्टेंबर महिन्यात जीएसटी संकलनातील वार्षिक वाढ १४.७ टक्के होती. तसेच चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये एप्रिलनंतर ऑक्टोबर महिन्यातील संकलन सर्वाधिक ठरले आहे. एप्रिलमध्ये सरकारला २.४३ लाख कोटी रुपयांचा जीएसटी महसूल मिळाला होता. ऑक्टोबर महिन्यात जीएसटी संकलन वाढण्यामागे आयात आणि देशांतर्गत बाजारातील व्यवहारांचा मोठा वाटा आहे.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.३० ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: ३९.५० क्विंटल

किमान	कमाल	सरासरी
२,९००	४,२०१	३,२१०

ज्वारी/हायब्रिड : ८३.५० क्विंटल

३,४९०	७,८५६	५,७३६

मका/लोकल: १.०० क्विंटल

२,३००	२,३००	२,३००

तूर : ५.००क्विंटल

७,४००	९,८००	८,७३३

उडीद : ५.०० क्विंटल

८,९९९	९,२००	९,०९९

बाजरी: १४.५० क्विंटल

३,५००	३,९००	३,७१७

मुग: २.०० क्विंटल

९,२००	९,३०१	९,२५०

सोयाबीन: १४२.०० क्विंटल

६,७००	६,९२५	६,८४२

हरभरा: ४.५० क्विंटल

५,८००	७,११०	६,५१३

कर्जमुक्तीच्या लाभासाठी शेतकरी कागदपत्रांच्या जंजाळात!

ॲग्रीस्टॅक नोंदणी करूनही सातबारा, आठ-अ पुन्हा जोडण्याची सक्ती

पुणे । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्याच्या प्रक्रियेत मुलभतेऐवजी कागदपत्रांच्या जंजाळात अडकवले जात असल्याचे चित्र समोर आले आहे. आधीच ग्रीस्टॅक नोंदणीच्या माध्यमातून शेतजमिनीची माहिती शासनाच्या डिजिटल यंत्रणेत उपलब्ध करून दिलेली असताना कर्जमुक्तीसाठी पुन्हा सातबारा, आठ-अ, आधारकार्ड, मोबाईल क्रमांक आणि बँक खात्याचे तपशील मागवले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे.

कर्जमुक्ती योजनेच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक क्रमांक देण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या. त्यानुसार अनेक शेतकऱ्यांनी सातबारा जोडून नोंदणी पूर्ण केली असून त्यांना क्रमांकही मिळाला आहे. मात्र, आता कर्जमुक्तीच्या अर्जासोबत पुन्हा सातबारा आणि आठ-अच्या प्रती जोडण्यास सांगितले जात आहे. त्याचबरोबर आधारकार्ड, मोबाईल क्रमांक आणि बँक खात्याचा आयएफएससी कोडही मागवला जात आहे. त्यामुळे ग्रीस्टॅक नोंदणीसाठी यापूर्वी जमा केलेल्या माहितीचा उपयोग नेमका कशासाठी, असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत. कागदपत्रांच्या या प्रक्रियेचा आर्थिक भारही शेतकऱ्यांवर पडत आहे. एका शेतकऱ्याच्या नावावर



दहा गट क्रमांक असतील, तर प्रत्येक गटाचा स्वतंत्र सातबारा काढण्यासाठी खर्च करावा लागत आहे. एका सातबाऱ्यासाठी साधारण ३० ते ३५ रुपये खर्च येत असल्याने दहा गटांच्या सातबाऱ्यांसाठी सुमारे ३०० रुपयांपर्यंत रक्कम मोजावी लागत आहे. कर्जमुक्तीचा लाभ मिळण्यापूर्वीच कागदपत्रांसाठी पदरमोड करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. पीएम किसान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे आधार क्रमांक, बँक खाते आणि मोबाईल क्रमांक यांची माहिती शासनाकडे उपलब्ध आहे. या योजनेतील आर्थिक मदतही थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर ऑनलाइन जमा ▶▶ पान २ वर

दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडेंचा मंत्रिमंडळात समावेश होण्याची चर्चा



मुंबई । प्रतिनिधी

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत घडामोडींना अचानक वेग आला आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील आणि धनंजय मुंडे यांच्या मंत्रिमंडळातील पुनरागमनाची चर्चा सुरू झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली आहे. राज्यातली सध्याच्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही भेट झाल्याची माहिती आहे. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, खासदार प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे आणि हसन मुश्रीफ उपस्थित होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय गृहमंत्री अमित शहांबरोबर झालेल्या भेटीत राष्ट्रवादीच्या नेत्यांची महत्त्वाच्या विषयांवर चर्चा. यावेळी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस विलनीकरण नकोच अशी भूमिका मांडण्यात आली. तसेच खाते वाटपावरही चर्चा झाली. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील आणि धनंजय मुंडे या दोन्ही अनुभवी नेत्यांना पुन्हा एकदा मंत्रीमंडळात स्थान मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्यातील न्यायालयांना बॉम्बने उडविण्याची धमकी

ठाणे, सांगली, सोलापूर, बीड, परभणी, हिंगोलीसह अनेक न्यायालयांना धमकीचे ई-मेल

पुणे-बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील जिल्हा न्यायालयांना बॉम्बस्फोट घडवून उडवून देण्याची धमकी देणारे ई-मेल प्राप्त झाल्याने राज्यभरात एकच खळबळ उडाली आहे. ठाणे, सांगली, सोलापूर, बीड, परभणी आणि हिंगोलीसह राज्यातील अनेक जिल्हा न्यायालयांना लक्ष्य करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या धमकीनंतर पोलीस प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणा तातडीने सतर्क झाल्या असून, खबरदारीचा उपाय म्हणून अनेक न्यायालयांचा परिसर रिकामा करण्यात आला आहे.

राज्यातील विविध जिल्हा न्यायालयांच्या अधिकृत ई-मेलवर बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी देणारे संदेश पाठवण्यात आले. संबंधित न्यायालय प्रशासनाला या ई-मेलची माहिती मिळताच पोलिसांना तातडीने कळविण्यात



आले. त्यानंतर पोलिसांनी न्यायालय परिसरात धाव घेत सुरक्षा व्यवस्था ताब्यात घेतली. न्यायालयातील न्यायाधीश, वकील, न्यायालयीन कर्मचारी तसेच विविध कामांसाठी आलेल्या नागरिकांना तातडीने सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले. धमकीचे गांभीर्य लक्षात घेत ▶▶ पान २ वर



विरोधकांचे कारस्थान-मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी

काँग्रेस आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या राजवट बदलण्याच्या मोहिमेमागील खरा अजेंडा लोकशाही व्यवस्था, संविधानिक संस्थांना उद्ध्वस्त करण्याचा आहे, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केला.

हे एक खोलवर रचलेले कारस्थान असल्याचे त्यांनी म्हटले. ▶▶ पान २ वर

राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासाठी भाजप मैदानात; सुनेत्रा-पार्थ यांना वगळण्याची खेळी?

शाहांच्या दरबारात राष्ट्रवादीचा सत्तावाटपाचा तिढा; दोन मंत्रिपदांची ऑफर?



दिल्ली । वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणावरून महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा हालचालींना वेग आला आहे. शरद पवार गटाने दिल्लीत 'इंडिया' आघाडीच्या निदर्शनांत सहभाग घेतल्यानंतर भाजपने राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आणून त्यांना एनडीएमध्ये सामावून घेण्यासाठी प्रयत्न सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, या विलीनीकरणाच्या चर्चेत सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांना वगळण्याच्या शक्यतेने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

अजित पवार गटातील अंतर्गत मतभेद अद्याप कायम असल्याचे चित्र असून, याच पार्श्वभूमीवर प्रफुल पटेल, सुनील तटकरे, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, छगन भुजबळ, समीर भुजबळ आणि दिलीप ▶▶ पान २ वर

शरद पवार रुग्णालयात दाखल; दुष्काळ दौरा रद्द

पुणे । प्रतिनिधीर

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांना पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. किरकोळ तक्रारीच्या कारणामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान शरद पवार यांची प्रकृती उत्तम असून त्यांच्या काही वैद्यकीय३ चाचण्या सुरू असल्याची माहिती खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे.



गेल्या दोन दिवसांपासून शरद पवार यांना सतत खोकल्याचा त्रास होत असल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच तीन दिवस दुष्काळग्रस्त भागांचा दौरा केल्यानंतर त्यांची तब्येत बिघडल्याची माहिती समोर आली आहे. शरद पवार हे दर महिन्याला नियमित तपासणीसाठी रुबी हॉल रुग्णालयात ▶▶ पान २ वर

नांदेडमध्ये श्रीराम फायनान्ससह बजाज फायनान्सची कार्यालये फोडली!

नांदेड । प्रतिनिधी

दुष्काळात शेतकऱ्यांच्या दारात जाऊन जबरदस्ती वसुली कराल, महिलांना त्रास द्याल, तर एकही फायनान्स कंपनीचे कार्यालय शिल्लक ठेवणार नाही, असा आक्रमक इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिला होता. या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर नांदेडमध्ये क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे



जिल्हाध्यक्ष बाळासाहेब जाधवसह त्यांच्या कार्यकर्त्यांनी दोन खासगी फायनान्स कंपन्यांच्या कार्यालयांची तोडफोड केली आहे. या घटनेमुळे नांदेडमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

राज्यात दुष्काळाने शेतकरी, शेतमजूर आणि भूमिहीन कुटुंबांचे जगणे कठीण झाले असताना मायक्रोफायनान्स आणि खासगी फायनान्स कंपन्यांकडून सक्तीची वसुली सुरू असल्याचा गंभीर आरोप रविकांत तुपकर यांनी यापूर्वी केला होता. 'वसुलीवाल्यांनो, शेतकऱ्यांच्या ▶▶ पान २ वर

राज्यातील ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी गुरूवारी सामुहिक रजेवर

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई उच्च न्यायालयाप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही वेतन मिळावे, या मागणीसाठी राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांच्या संघटना एल्गार पुकारणार आहेत. सुरूवातीला ६ सप्टेंबर रोजी १ दिवस, त्यानंतर १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी दोन दिवस काळ्या फिती लावून काम केल्यानंतर न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी सामुहिक रजेचे हत्यार उपासले जाणार आहे.

येत्या गुरूवारी (दि.५) सर्व न्यायालयीन कर्मचारी सामुहिक रजेवर जाणार आहेत. त्यानंतर अवघे दोनच दिवस दिवाळीपूर्वी न्यायालयाचे कामकाज असणार आहे. त्यावेळी कर्मचारी सामुहिक रजेवर जाण्याचा फटका पक्षकारांसह न्यायालयीन कामकाजाला ▶▶ पान २ वर

बीड जवळील मंझरी फाट्यावर होणार उड्डाणपुल!

ना.पंकज मुंडेंच्या पत्राला केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे पंधरा मिनिटांतच उत्तर, सर्वेक्षणाचे दिले आदेश





नवी दिल्ली । वृत्तसंस्था

बीड जिल्ह्यातील रेल्वे, रस्ते आणि महामार्गाच्या प्रश्नांवर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी सोमवारी नवी दिल्लीत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. मंझरी हवेली फाटा येथे महामार्गावर वारंवार होणारे अपघात लक्षात घेऊन याठिकाणी उड्डाणपूल मंजूर करावा अशी मागणी त्यांनी केल्यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून केवळ पंधरा मिनिटांतच त्यांच्या पत्राला उत्तर मिळाले आणि उड्डाणपुलाच्या सर्वेक्षणाचे आदेश निघाले.

ना. पंकजाताई मुंडे सोमवारी नवी दिल्लीत होत्या. सकाळी त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक ▶▶ पान २ वर

रेल्वे मार्गासाठी घेतली केंद्रीय मंत्र्यांची भेट

दरम्यान, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची देखील ना. पंकजाताई मुंडे यांनी भेट घेतली. या भेटीत बीड जिल्ह्यातील बीड-परळी रेल्वेमार्ग व जिल्ह्यातील रेल्वेच्या इतर समस्यांबाबत सविस्तर निवेदन देवुन चर्चा केली. मुंबई- लातूर, मछलीपट्टणम-बिदर, हैदराबाद-बिदर ह्या रेल्वेसेवा परळी वैजनाथ पर्यंत विस्तारीत कराव्यात तसेच परळी-बीड रेल्वेचे काम जलदगतीने पूर्ण करावे, अशी मागणी त्यांनी पत्राद्वारे केली. या मागणीलाही रेल्वेमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत याबाबत लवकरच कार्यवाही करण्याचा शब्द दिला.

जिल्हाध्यक्ष मस्के यांच्या रस्ता रोकोला आमदार खासदाराची दांडी

बीड । प्रतिनिधी

दुष्काळी उपाययोजनाची तातडीने अंमलबजावणी करा पुण्याच्या पाण्याचे नियोजन करा यावर इतर मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या नेतृत्वाखाली आज सकाळी दहा वाजता अहिल्यानगर बीड मार्गावरील चराटा फाटा येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले मात्र या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची खासदार बजरंग सोनवणे स्थानिक लोकप्रतिनिधी संदीप क्षीरसागर यांच्या अनुपस्थितीने अनेकांच्या भुवया उंचावल्या मागील आंदोलनात जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के सहभागी झाले ना आता आमदार खासदार यांनी मारलेली दांडी पक्षात काही वेगळच सुरू आहे हे आता हळूहळू दिसत आहे.

सविस्तर बातमी पान २ वर

अग्रलेख

खुर्च्या मोजणाऱ्यांची नजर आणि देशाचे प्रश्न : उत्तरदायित्व कुणाचे?

देशात सगळं काही आलबेल असल्याचा आभास निर्माण केला जात आहे! बेरोजगारीचा प्रश्न नाही, महागाईचे संकट नाही, शेतकऱ्यांच्या व्यथा नाहीत, सीमेवर चीनच्या हालचालींची चिंता नाही आणि निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्हच नाही! जर सगळंच सुजलाम सुफलाम असेल, तर मग सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी करायचं तरी काय? अशा वेळी विरोधकांच्या, विशेषतः राहुल गांधींच्या सभेत किती लोक आले, किती खुर्च्या रिकाम्या राहिल्या आणि किती जण सभेतून निघून गेले, याची मोजदाद करण्यातच आपली ऊर्जा खर्च करणे, हेच सध्याच्या राजकीय संस्कृतीचे वास्तव बनले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पक्षाला आज देशासमोरील ज्वलंत प्रश्नांपेक्षा विरोधकांच्या सभेतील गर्दीची चिंता अधिक आहे, हे दुर्दैवी आहे.

दिल्लीच्या रामलीला मैदानावर राहुल गांधी आणि 'इंडिया' आघाडीने मतचोरीच्या आणि लोकशाहीच्या मुद्यावर घेतलेली सभा असो वा अन्य राजकीय घडामोडी असो, सत्ताधारी पक्षाकडून नेहमीच गर्दी कमी असल्याचा दावा केला जातो. खुर्च्यांचे फोटो झळकवत पत्रकार परिषदा घेतल्या जातात. देशात लोकशाहीचे भवितव्य धोक्यात आल्याचे प्रश्न उपस्थित होत असताना, निवडणूक प्रक्रियेवर संशयाचे काळे ढग दाटले असताना, भाजपचा संपूर्ण राजकीय अभ्यास मात्र 'खुर्च्यांच्या गणितावर' येऊन ठेपला आहे. वा रे वा! लोकशाहीचे प्रश्न गौण ठरवून गर्दी मोजण्यात धन्यता मानणाऱ्या या राजकारणात जनतेच्या प्रश्नांची उत्तरे देण्याची हिंमत सरकार दाखवणार का, हा खरा कळीचा मुद्दा आहे. आज देशासमोर काही मूलभूत आणि अत्यंत गंभीर प्रश्न उभे ठाकले आहेत. पहिला आणि सर्वात मोठा प्रश्न मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीचा आणि मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रियेचा (एसआयआर) आहे. मतदारांची नावे पद्धतशीरपणे वगळली जात असल्याचा गंभीर आरोप विरोधक करत असून, पात्र नागरिकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवले जाण्याची भीती व्यक्त होत आहे. महाराष्ट्र, बंगालपासून अनेक राज्यांत यावरून वादळ उठले आहे. जर मतदार याद्यांमध्ये सर्व काही पारदर्शक आहे, तर मग स्वतंत्र आणि निष्पक्ष तपासणीला एवढा विरोध कशासाठी? लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा आहे का? निवडणूक आयोगाला प्रश्न विचारण्याचा अधिकार फक्त सत्ताधाऱ्यांनाच आहे का? दुसरा प्रश्न थेट निवडणूक आयोगाच्या आतील अनागोंदी कारभारावर प्रकाश टाकणारा आहे. खुद्द निवडणूक आयुक्त सुखबीरसिंह संधू आणि विवेक जोशी यांनी केंद्रीय मंत्रिमंडळ सचिवांना स्वतंत्र पत्रे लिहून प्रशासकीय बाबींवर आक्षेप घेतल्याची चर्चा आहे. देशाची निवडणूक व्यवस्था सांभाळणाऱ्या सर्वोच्च संस्थेतील आयुक्तांवर अशी पत्रे लिहिण्याची वेळ का आली? आयोग जर स्वायत्त असेल, तर या पत्रांमधील आक्षेप सार्वजनिक का केले जात नाहीत? आयोग ही लोकशाहीची घटनात्मक संस्था आहे की सत्ताधाऱ्यांच्या सोयीने चालणारी यंत्रणा? हा प्रश्न विचारण्याचा अधिकार जनतेला आहे. तिसरा प्रश्न एसआयआरच्या नावाखाली मतदारांच्या अधिकारांशी खेळ चालल्याचा आहे. स्वच्छतेच्या नावाखाली पात्र मतदारांची नावे गायब झाली आणि सामान्य माणसाला स्वतःचे नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागले, तर ही कसली लोकशाही? कागदपत्रांच्या तांत्रिक मर्यादांमध्ये मतदारांना अडकवून त्यांची परीक्षा पाहण्याचा हा प्रकार थांबणार का? चौथा प्रश्न देशातील वाढत्या गुन्हेगारी आणि लॉरेन्स बिश्नोईसारख्या टोळ्यांच्या जाळ्याशी संबंधित आहे. साबरमती तुरुंगात बंद असलेल्या गुन्हेगारावर नियंत्रण ठेवण्यात किंवा इतर राज्यांच्या पोलिसांना कायदेशीर प्रक्रिया पार पाडण्यात जर केंद्राच्या निर्बंधांमुळे अडचणी येत असतील, तर गुन्हेगारी संपणार कशी? सरकारला विरोधकांच्या सभेतील गर्दी मोजायला वेळ आहे, पण गुन्हेगारी टोळ्यांचा बिमोड करायला वेळ कधी मिळणार? पाचवा आणि देशाच्या सुरक्षेचा अत्यंत संवेदनशील प्रश्न चीनच्या सीमेवरील हालचालींचा आहे. अरुणाचल प्रदेशातील सीमेवर चीनकडून रस्ते, गावे आणि पायाभूत सुविधांचा मोठा विस्तार सुरू असल्याच्या बातम्या वारंवार येत आहेत. मग भारताची प्रत्यक्ष तयारी काय आहे? सीमावर्ती नागरिकांच्या सुरक्षेसाठी सरकार काय करत आहे? या प्रश्नांची उत्तरे मागितली की लगेच देशविरोधी असल्याचा शिक्का मारणे कितपत योग्य आहे? थोडक्यात सांगायचे तर, राहुल गांधींच्या सभेत किती खुर्च्या रिकाम्या होत्या, याचा हिशेब भाजपने सविस्तर लावला आहे. परंतु, निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर निर्माण झालेल्या प्रश्नांचा हिशेब कोण देणार? मतदारांच्या अधिकारांचे रक्षण कोण करणार? गुन्हेगारीला वेसण कधी घालणार? आणि चीनच्या आक्रमक धोरणावर सरकारची नेमकी भूमिका काय, हे जनतेला कधी समजणार? भाजपला राहुल गांधींच्या सभेतील गर्दी कमी दाखवायची असेल तर खुशाल दाखवा, फोटो दाखवा आणि खुर्च्या मोजत बसा. पण एक विसरून चालणार नाही, देश चालवण्यासाठी गर्दीचे फोटो पुरेसे नसतात, त्यासाठी उत्तरदायित्व लागते.! राहुल गांधींच्या सभेत खुर्च्या रिकाम्या होत्या की भरलेल्या, हा सत्ताधाऱ्यांचा राजकीय कल असू शकतो; पण सरकारच्या धोरणांत आणि उत्तरांमध्ये जागा रिकाम्या का आहेत, हा सामान्य जनतेचा जाब आहे. आणि जनतेच्या प्रश्नांना बगल देऊन केवळ गर्दी मोजणारे सत्ताधारी हे विसरत आहेत की, निवडणुकांमध्ये खुर्च्या नाही, तर जनताच अंतिम आणि खात्रीशीर हिशेब करत असत.!

जनावरांना चारा द्यावणीला द्या, किंवा छावणीला द्या, परंतु तातडीने द्या!

शेतकरी गुराढोरासह आंदोलनात सहभागी दीड तास चक्काजाम-राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

खरीप हातचं गेलं, रब्बीची आशाही मावळली! कर्जाचा डोंगर आणि रिकामे खिसे घेऊन बळीराजा जगण्याची लढाई लढतोय! शेतकरी तरला तरच ग्रामीण अर्थव्यवस्था टिकेल आणि ग्रामीण महाराष्ट्राची आर्थिक घडी सावरू शकेल. त्यामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना केवळ घोषणांचा आधार नको, तर ठोस आणि तातडीची मदत हवी. शासनाने शेतकरी मायबापाला सढळ हस्ते, प्रामाणिकपणे आणि तातडीने मदत करावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.



राज्य सरकारने दुष्काळाचा केवळ जीआर काढला, घोषणांची खैरात केली; मात्र प्रत्यक्षात अद्याप कोणत्याही उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी केलेली नाही. शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत असताना ठोस उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबत प्रशासनाच्या हालचालीही दिसून येत नाहीत. शासनाच्या या उदासीन भूमिकेमुळे शेतकरी बांधवांची चिंता अधिकच वाढली आहे. दुष्काळामुळे चिंताग्रस्त झालेल्या शेतकरी बांधवांच्या व्यथा आणि प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या नेतृत्वाखाली बीड येथील चराठा फाटा येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनस्थळी बीडचे तहसीलदार श्री. शेळके साहेब यांना शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळावा आणि शासनाने जाहीर केलेल्या उपाययोजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी, अशी आग्रही भूमिका यावेळी मांडण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राज्य प्रवक्ते प्रा. शिवराज बांगर, जिल्हा उपाध्यक्ष सुभाषराव सपकाळ, तालुकाध्यक्ष राजेंद्र मोटे, माजी सभापती सोमनाथराव माने पाटील, जिल्हा उपाध्यक्ष अनिल पानसंबळ सर, गवते सर, जिल्हा चिटणीस अखिल भाई, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब मोरे पाटील यांच्यासह सरपंच, उपसरपंच, चेअरमन, शेतकरी, पशुपालक आणि शेतमजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे, या आंदोलनात शेतकरी, शेतमजूर, दूध उत्पादक शेतकरी हे आपल्या बैलगाड्यांसह तसेच पशुधन घेऊन मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बळीराजाच्या या सहभागातून दुष्काळाची भीषणता आणि शासनाकडून तातडीच्या मदतीची असलेली अपेक्षा अधोरेखित झाली. शेतकऱ्यांना आश्वासनांवर जगवता येणार नाही. त्यांना जगण्यासाठी प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. त्यामुळे शासनाने केवळ घोषणा न करता दुष्काळी उपाययोजनांची तातडीने आणि प्रभावी अंमलबजावणी करावी, हीच या आंदोलनाची प्रमुख मागणी आहे. आंदोलनाच्या माध्यमातून विविध मागण्या प्रशासनाकडे देण्यात आले.

माजी आ.अमरसिंह पंडित,आ.विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्याला यश

पैठण उजव्या कालव्याला ५ नोव्हेंबरपासून पाणी सुटणार

रब्बी हंगामासाठी तीन आवर्तने मंजूर; गोदावरी नदीवरील बॅरेजमध्येही पिण्यासाठी पाणी सोडण्यास मान्य

गेवराई । प्रतिनिधी

जायकवाडी धरणाच्या पैठण उजवा कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत रब्बी हंगामासाठी तीन आवर्तने देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, पहिली पाणीपाळी दि. ५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी यासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. या निर्णयामुळे गेवराई विधानसभा मतदारसंघातील शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, मतदारसंघातील शेतकरी व जनतेकडून आभार मानले जात आहेत.



जायकवाडी धरणाच्या पैठण उजवा कालवा सल्लागार समितीची बैठक आज छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीत पाणी नियोजनासंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली, या बैठकीत रब्बी हंगामासाठी चार आणि उन्हाळी हंगामासाठी दोन आवर्तने देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी रब्बी हंगामासाठी तीन आवर्तने देण्याची मागणी मान्य करण्यात आली असून, पहिली पाणीपाळी ५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. यामुळे रब्बी हंगामातील पिकांना पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. दुष्काळ व पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेता गोदावरी नदीपात्रातील सर्व बॅरेज एप्रिल महिन्यात पाण्याने भरून देण्याची मागणी करण्यात आली. पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन बॅरेजमध्ये पाणी सोडण्यासही मान्यता देण्यात आली. सध्या जायकवाडी धरणात ७४ टक्के म्हणजेच सुमारे ५८ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असून, या पाण्याचा नियोजनबद्ध वापर करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. माजी आ. अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे रब्बी हंगामासाठी तीन आवर्तने आणि पिण्याच्या पाण्यासाठी बॅरेजमध्ये पाणी सोडण्याचा निर्णय मार्गी लागला आहे. त्यामुळे गेवराई विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, नागरिकांमधून समाधान व्यक्त होत असून, या निर्णयासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह माजी आमदार अमरसिंह पंडित व विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

आचारसंहितेत निविदा प्रसिद्धीचे प्रकरण पुन्हा ऐरणीवर

दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची अजय सरवदे यांची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या आचारसंहिता कालावधीत जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत सुमारे ३० लाख रुपयांची निविदा प्रसिद्ध केल्याचे प्रकरण पुन्हा ऐरणीवर आले आहे. या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे. वारंवार पाठपुरावा करूनही जिल्हा परिषद प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

बीड जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक १ मार्फत जुन्या व नवीन प्रशासकीय इमारतीतील स्वच्छतागृह आणि खुल्या परिसराच्या साफसफाईसाठी २९ लाख ३० हजार ९८७ रुपयांची निविदा महा-ई-टेंडर प्रणालीवर प्रसिद्ध करण्यात आली होती. निविदा प्रसिद्धीची तारीख १० डिसेंबर २०२५, तर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख १७ डिसेंबर २०२५ होती. त्यावेळी बीड नगरपरिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने सरवदे यांनी १५ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी आणि संबंधित प्रशासनाकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीनंतर निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाने १८ डिसेंबर २०२५ रोजी संबंधित कार्यकारी अभियंत्यांना खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार बांधकाम विभागाने खुलासा सादर केला. मात्र, आचारसंहितेचा भंग झाला किंवा नाही, याबाबत स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून अंतिम निर्णय जाहीर करण्यात आलेला नसल्याचा आक्षेप सरवदे यांनी घेतला आहे. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी मिळालेल्या पत्रानुसार, हे प्रकरण पुढील निर्णय व कार्यवाहीसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) प्रदीप काकडे यांच्याकडे सादर करण्यात आले होते. मात्र, त्यावेळीही कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे पत्रात नमूद करण्यात आले होते. संबंधित अधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय सरवदे यांनी व्यक्त केला असून, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान यांनीही या प्रकरणात लक्ष घालून कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. यासंदर्भात २२ ऑक्टोबर २०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना पुन्हा निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष फेरचौकशी करावी, आचारसंहितेचा भंग किंवा प्रशासकीय अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करावी, केवळ मोघम खुलाशाच्या आधारे प्रकरण निकाली काढू नये आणि चौकशीचा अहवाल व अंतिम निर्णय लेखी स्वरूपात द्यावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

व्यसनमुक्ती (नशामुक्ती) निरोगी जीवन-डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी



आजचे आरोग्यज्ञान : व्यसनमुक्ती १ व्यसन लागण्याची प्रमुख कारणे मानसिक ताण आणि चिंता मित्रपरिवाराचा प्रभाव कुतूहल किंवा चुकीची संगत एकटेपणा आणि नैराश्य दारू, तंबाखू, गुटखा आणि इतर व्यसनांची सहज उपलब्धता २ व्यसनाची प्रमुख लक्षणे - व्यसन करण्याची सतत इच्छा होणे व्यसन न मिळाल्यास चिडचिड होणे कामात लक्ष न लागणे कुटुंबापासून दूर राहणे- आर्थिक अडचणी आणि आरोग्याकडे दुर्लक्ष होणे. ३ व्यसनमुक्तीसाठी काय करावे? व्यसनमुक्त होण्याचा ठाम निर्णय घ्या. व्यसन करणारी संगत आणि परिस्थिती टाळा. कुटुंबीयांचा आणि मित्रांचा आधार घ्या. नियमित व्यायाम, योग आणि ध्यान करा. तंबाखू किंवा गुटखा सोडण्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या. गरज असल्यास व्यसनमुक्ती केंद्राची मदत घ्या. महत्त्वाची आरोग्यविषयक माहिती दारूचे व्यसन असल्यास अचानक दारू बंद करणे धोकादायक ठरू शकते. वैद्यकीय सल्ल्यानेच व्यसनमुक्तीची प्रक्रिया सुरू करा. आजची व्यसन सोडणे कठीण असू शकते, पण योग्य उपचार, कुटुंबाचा आधार आणि स्वतःची इच्छाशक्ती यामुळे व्यसनमुक्त जीवन शक्य आहे असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)-न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

वैद्यकीय रजेनंतर रुजू करण्यासाठी पैशाची मागणी करणाऱ्या नांदूरकरावर कारवाई करा

बीड । प्रतिनिधी

आजारी रजेनंतर कर्तव्यावर रुजू करून घेण्यासाठी गेवराई पंचायत समिती शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी चक्क शिक्षकाच्या पत्नीचे सौभाग्याचे मंगळसूत्र विकायला लावून लाच उकळल्याचा संतापजनक व मानवतेला काळिमा फासणारा प्रकार उघडकीस आला आहे. या सततच्या आर्थिक पिळवणुकीमुळे आणि मानसिक त्रासामुळे त्रस्त झालेल्या पीडित शिक्षकाने पत्नीसह बीड जिल्हा परिषद आवारात टाहो फोडत आत्महत्येचा प्रयत्न केल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबन, बडतर्फी व फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी भ्रष्टाचार निर्मूलन समितीने मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री आणि शिक्षण विभागाकडे केली आहे.

गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा खळेगाव येथे कार्यरत असलेले सहशिक्षक आबासाहेब दगडू देशमुख हे २२ एप्रिल २०२६ ते ६ मे २०२६ या कालावधीत आजारपणामुळे रुग्णालयात दाखल असल्याने वैद्यकीय रजेवर होते. आजारपणातून बरे झाल्यानंतर आणि उन्हाळ्याच्या सुट्या संपल्यानंतर नियमानुसार वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करून ते कर्तव्यावर रुजू होण्यासाठी गेले असता, त्यांना रुजू करून न घेता अडवणूक करण्यात आली. तक्रारीनुसार, गेवराईचे तत्कालीन गटशिक्षणाधिकारी व ज्येष्ठ विस्तार अधिकारी भीमाशंकर नांदुरकर यांनी देशमुख यांना रुजू करून घेण्यासाठी बेकायदेशीर लाचेची मागणी केली. आर्थिक चणचण व पगार बंद होण्याच्या भीतीपोटी लाचेची रक्कम देण्यासाठी अखेर शिक्षकाच्या हतबल पत्नीला स्वतःचे मंगळसूत्र सोनाराकडे विकून/गहाण ठेवून अधिकाऱ्याला पैसे द्यावे लागले, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. पीडित शिक्षकाने बीड येथे धाव घेऊन दाद मागितल्यानंतर प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी वस्तुस्थिती तपासून देशमुख यांना तत्काळ शाळेवर रुजू करून घेण्याचे स्पष्ट आदेश २ नोव्हेंबर रोजी दिले. मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश असतानाही विद्यमान गटशिक्षणाधिकारी मोदानी यांनी पुन्हा पैशांची मागणी करत शिक्षकाला रुजू करून घेण्यास नकार दिल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे.

पान १ वरून...

कर्जमुक्तीच्या लाभासाठी शेतकरी

केली जाते. दुसरीकडे, ॲग्रीस्टॅकच्या माध्यमातून शेतजमिनीची माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाली आहे. महसूल, कृषी आणि बँकिंग यंत्रणांकडे संबंधित माहिती असतानाही तिचा परस्पर ताळमेळ घालून पडताळणी करण्याऐवजी पुन्हा शेतकऱ्यांकडूनच कागदपत्रांची मागणी केली जात असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. शासनाने उपलब्ध डिजिटल माहितीच्या आधारे पडताळणी करावी. आधार आणि मोबाईल क्रमांकाच्या माध्यमातूनही आवश्यक माहितीची खातरजमा करता येऊ शकते. मग प्रत्येक वेळी सातबारा, आठ-अ आणि झेरॉक्स प्रतींचा आग्रह कशासाठी, असा सवाल शेतकरी करीत आहेत. केवळ कागदपत्रांच्या मागणीपुरतीच अडचण मर्यादित नसून अर्जाच्या नमुन्याबाबतही तक्रारी आहेत. आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक, बँक खाते आणि आयएफएससी कोड भरण्यासाठी पुरेशी व स्वतंत्र जागा उपलब्ध नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. काही ठिकाणी अत्यंत लहान रकाने असल्याने माहिती भरताना अडचणी येत आहेत. त्यातच अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे जमा करण्यासाठी अल्प मुदत दिली जात असल्याने शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे. अनेक शेतकऱ्यांपर्यंत योजनेची माहिती वेळेत पोहोचलेली नाही. गावपातळीवर पुरेशी जनजागृती नसताना अचानक अर्ज भरण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. ऑनलाइन प्रक्रिया, कागदपत्रांची जुळवाजुळव आणि मुदतीची घाई यामुळे विशेषतः अल्पशिक्षित आणि वयोवृद्ध शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. कर्जमुक्तीचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना मदत होण्याऐवजी प्रक्रिया अधिक किचकट होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. अपात्र ठरवलेल्या सुमारे सात हजार शेतकऱ्यांची कारणांसह यादी जाहीर करावी, कागदपत्रांची पुनर्मागणी टाळावी आणि डिजिटल माहितीच्या आधारे पडताळणी करून अर्जप्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

राज्यातील न्यायालयांना बॉम्बने उडविण्याची

बॉम्बशोधक आणि नाशक पथकांना पाचारण करण्यात आले. न्यायालयाच्या इमारती, विविध कक्ष आणि संपूर्ण परिसराची कसून तपासणी करण्यात आली. दरम्यान, सुरक्षेच्या दृष्टीने काही जिल्ह्यांमध्ये न्यायालयीन कामकाज तात्पुरते थांबविण्यात आले. अचानक उद्भवलेल्या या परिस्थितीमुळे न्यायालयीन कामासाठी आलेले पक्षकार, वकील आणि नागरिकांची यावेळी धावपळ उडाली. धमकीचे ई-मेल नेमके कोठून पाठविण्यात आले, त्यामागे कोणाचा हात आहे आणि हा खोडसाळपणा आहे की प्रत्यक्ष घातपाताचा कट, याचा तपास सुरक्षा यंत्रणांकडून केला जात आहे. दरम्यान, राज्यातील अनेक जिल्हा न्यायालयांना एकाच वेळी धमकीचे ई-मेल प्राप्त झाल्याने या प्रकरणाची व्याप्ती गंभीर मानली जात आहे. तपास यंत्रणांकडून ई-मेलचा स्रोत शोधण्याचे प्रयत्न सुरू असून, तपासणीत काय निष्पन्न होते, याकडे लक्ष लागले आहे.

शरद पवार रुग्णालयात

जातात. दरम्यान, खासदार सुप्रिया सुळे यांनी व्हॉट्सॲप स्टेटसच्या माध्यमातून शरद पवार यांना रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल केल्याची माहिती दिली. त्यांच्या काही वैद्यकीय चाचण्या सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच शरद पवार यांची प्रकृती उत्तम असल्याचे सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले आहे.

राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासाठी भाजप

वळसे पाटील या नेत्यांनी सोमवारी सकाळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची त्यांच्या अधिकृत निवासस्थानी भेट घेतली. या बैठकीत राष्ट्रवादीच्या भविष्यातील राजकीय वाटचालीसह दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या शक्यतेवर चर्चा झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, या भेटीत अजित पवार गटातील प्रमुख नेते एकत्र असल्याचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांच्याशी काही नेत्यांचे मतभेद असल्याचेही भाजपच्या सूत्रांनी सूचित केले. त्यामुळे राष्ट्रवादीचे विलीनीकरण नेमके कोणाच्या नेतृत्वाखाली आणि कोणत्या राजकीय समीकरणातून होणार, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येऊन स्वतंत्र राजकीय घटक म्हणून एनडीएमध्ये सहभागी व्हावेत, अशी भाजप नेतृत्वाची भूमिका असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. या संभाव्य विलीनीकरणासाठी सत्तेचे समीकरण जुळविण्याच्या दृष्टीने केंद्रीय मंत्रिमंडळात दोन मंत्रिपदे देण्याची तयारी भाजपने दर्शविल्याचीही चर्चा आहे. राष्ट्रवादीला स्वतंत्र घटक म्हणून सोबत घेतल्यास महाराष्ट्रातील मराठा आणि बिगर-ब्राह्मण मतदारांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असे भाजपच्या रणनीतीकारांचे गणित असल्याचे सांगितले जाते. मात्र, सत्तेतील वाटपावरून भाजपमध्येच मित्रपक्षांना अधिक महत्त्व दिले जात असल्याची टीका होत असताना राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव पुढे नेणे हे भाजपसाठीही राजकीय आव्हान ठरू शकते. त्यामुळे मित्रपक्षांना सोबत घेताना पक्षातील मूळ नेते आणि कार्यकर्त्यांची नाराजी वाढणार नाही, याची काळजी भाजप नेतृत्व घेत असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. विलीनीकरणाच्या चर्चेतील सर्वात महत्त्वाचा अडथळा म्हणजे राष्ट्रवादीतील नेत्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा असल्याचे सूत्रांकडून सांगितले जात आहे. पार्थ पवार यांना त्यांच्या आई सुनेत्रा पवार यांच्यासाठी महाराष्ट्र सरकारमधील अर्थखाते हवे असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, दिवंगत अजित पवार यांनी देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये याच खात्याची जबाबदारी सांभाळली होती. याशिवाय पार्थ पवार यांची स्वतःची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावर विराजमान होण्याची इच्छा असल्याचेही सूत्रांचे म्हणणे आहे. दुसरीकडे, सुनील तटकरे, प्रफुल पटेल आणि छगन भुजबळ यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांना पक्षातील सत्तेचे वाटप अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक हवे आहे. त्यामुळे नेतृत्व, पक्षाध्यक्षपद, मंत्रिपदे आणि महाराष्ट्रातील सत्तेतील वाटा या मुद्द्यांवर एकमत होणे आवश्यक आहे.

कोणतेही मतभेद नाहीत, बैठक नियाजीतच-उमेश पाटील

दरम्यान, राष्ट्रवादीचे नेते उमेश पाटील यांनी हा दावा फेटाळून लावला. त्यांनी स्पष्ट केले की, सुनेत्रा पवार यांनी अमित शाह यांच्यासोबतच्या भागीदार भेटीतच पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे एक शिष्टमंडळ त्यांना भेटणार असल्याचे सांगितले होते आणि त्यासाठी वेळही मागितली होती. बैठक ही आधीच नियोजित आणि औपचारिक होती. उमेश पाटील यांनी असेही म्हटले की, या बैठकीला विनाकारण राजकीय रंग देण्याचा प्रयत्न केला जात आहे, ही दुर्दैवी बाब आहे.

विरोधकांचे कारस्थान-मुख्यमंत्री

मुंबईत भाजपने आयोजित केलेल्या लोकशाही आणि संविधान वाचवा रॅलीत फडणवीस यांनी सहभाग घेतला आणि त्याचे नेतृत्वही केले. बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंकेतील राजकीय घडामोडींचा संदर्भ देत त्यांनी दावा केला की, या देशांमधील घटनात्मक बदल आणि सत्तापालट हे एका मोठ्या आंतरराष्ट्रीय कारस्थानाचा भाग आहेत आणि भारतातही असेच प्रयत्न केले जात आहेत. विरोधक लोकशाही संस्थांना नष्ट करण्याचे समर्थन करण्यासाठी ते जनतेचा या संस्थांवरील विश्वास कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप त्यांनी केला. लोकशाहीत प्रत्येकाला सरकार बदलण्याचा अधिकार आहे. परंतु राजवट बदलणे म्हणजे काय? याचा अर्थ राजकीय व्यवस्था बदलणे, संविधान बदलणे आणि देशात स्थापित सर्व संस्थांमध्ये बदल करणे असा होतो. काँग्रेस आणि त्यांचे मित्रपक्ष संविधान वाचवा या घोषणेचा वापर राजवट बदलण्याच्या अजेंड्यासाठी करत आहेत. आमच्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आम्ही राजवट बदलू देणार नाही. आम्ही कोणालाही संविधानाला स्पर्श करू देणार नाही किंवा लोकशाहीला धोका निर्माण करू देणार नाही, असे त्यांनी म्हटले. ठाकरेसेना अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनीही राजवट बदलण्याला पाठिंबा दिला आहे, त्यांना या शब्दाचा अर्थही माहित नसावा, असेही फडणवीस यांनी आरोप केला.

बीड जवळील मंझरी फाट्यावर

व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. बीडचे गुजर समाज सेवा संघाचे अध्यक्ष राजेंद्र गुजर यांनी केलेल्या विनंतीवरून बीड - सोलापूर महामार्ग क्र ५२ वरील मंझरी हवेली फाटा हा रस्ता मोठ्या वर्दळीचा असल्याने याठिकाणी वारंवार अपघात होतात, हे टाळण्यासाठी या रस्त्यावर उड्डाणपूल मंजुर करावा अशी मागणी ना. पंकजाताई मुंडेंनी गडकरी यांच्याकडे केली. या मागणीची गडकरी यांनी तात्काळ दखल घेऊन संबंधित विभाग

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. ०३ नोव्हेंबर २०२६ ३

थोडक्यात

शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडीची नोंदणी करावी –प्रा. आंधळे

बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्यांसाठी विविध योजना शासनाने सुरू केलेल्या आहेत त्यामध्ये पीक कर्ज, पिक विमा, अनुदान अशा विविध प्रकारच्या योजना मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना फार्मर आयडीची आवश्यकता आहे सध्या याची नोंदणी मोहीम सुरू असून शेतकऱ्यांनी डिजिटल सातबारा आधार कार्ड आणि आधार कार्ड ची लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जवळच्या सीएससी किंवा महा-ई-सेवा केंद्र येथे ऑनलाइन नोंदणी करावी तसेच गावातील ग्रामपंचायत कार्यालयातील आपले सरकार केंद्र येथेही फार्मर आयडीची नोंदणी होते.



जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडीची नोंदणी करून घ्यावी असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने केले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या कृषी विषयक योजनांचा पारदर्शक जलद आणि थेट लाभ देण्यासाठी बीड जिल्ह्यात प्रकल्प राबविला जात आहे या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व खातेदार शेतकऱ्यांचा डिजिटल फार्मर आयडी तयार करण्याचे काम वेगाने सुरू आहे भविष्यात शासनाच्या सर्व सुविधा व अनुदानाचा लाभ घेण्यासाठी हा फार्मर आयडी अत्यंत अनिवार्य करण्यात आला आहे यापुढे पी एम किसान योजनेचे पुढील हप्ते व आर्थिक लाभ नियमित मिळण्यासाठी फार्मर आयडी असणे आवश्यक आहे तसेच महा डीबीटी द्वारे चालवल्या जाणाऱ्या अवजारे, बी बियाणे, सिंचन साधने व कृषी विभागाच्या इतर सर्व अनुदान योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आले असून नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई, पिक विमा यांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी आवश्यक आहे यामुळे याची नोंदणी करावी तसेच फार्मर आयडी असणाऱ्या शेतकऱ्यांना वारंवार कागदपत्रे देण्याची गरज लागत नाही त्यामुळे असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे अध्यक्ष प्रा. बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे*

दुर्बिणीद्वारे पितनलिकेची तपासणी व उपचार करून मेडिकेअर हॉस्पिटलमध्ये रुग्णाला मिळाले जीवदान

बीड । प्रतिनिधी

६५ वर्षीय रुग्ण अत्यंत गंभीर अवस्थेत मेडिकेअर हॉस्पिटल बीड येथे दाखल झालेत्यांचा बीपी आतिशय कमी झाला व हृदयाचे ठोके खूप जास्त वाढले होते.. ते मागील सात दिवसांपासून ताप व कावीळ ने त्रस्त होते



प्राथमिक तपासणी नंतर कळाले की त्यांच्या पिताशयाच्या नळीत खडा अडकल्यामुळे कावीळ व शरीरात इन्फेक्शन पसरले होतेडॉ अभिजीत लखमावार यांनी परिस्थिती चे गांभीर्य लक्षात घेऊन हळसह ीळीज्ञ एठउझ प्रोसीजर करून पिताशयाच्या नलिकेत स्टेंट बसवली..अवघ्या काही तासात रुणाची प्रकृती सुधारायला लागली आणि पेशेंट ला जीवनदान मिळालेदोन दिवसानंतर पेशेंट ला सुट्टी करण्यात आले..कळसह ीळीज्ञ एठउझ प्रोसीजर पहिल्यांदाच बीड मधे झालेली असून ह्या प्रोसिजर मूळे रुणांना जीवनदान मिळतो पूर्वी तज्ञ डॉक्टर च्या अभावामुळे अशा गंभीर रुणांना मोठ्या शहरांकडे जावे लागायचे आणि त्यामधे ट्रान्सपोर्टेशन रिस्क पण असायचीआता मेडिकेअर हॉस्पिटल बीड येथे पोटविकार तज्ञ पूर्ण वेळ उपलब्ध असल्यामुळे अशा गंभीर आजारावर उपचार बीड येथेच रुग्णांना मिळणार आहे.

दिवाळीच्या सणात बँकांनी गोठवलेली शेतकऱ्यांची खाती तात्काळ पूर्ववत करा

बँका, मायक्रोफायनान्स व पतसंस्थांची तातडीने बैठक घ्या–शेतकरी हक्क मोर्चाची मागणी

बीड । प्रतिनिधी

दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले असून, यंदाची दिवाळी गोड होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, सरकारने पाच हजार रुपयांची मदत देऊन शेतकऱ्यांची थट्टा केल्याची टीका होत असतानाच अनेक बँकांनी शेतकऱ्यांची नियमित बचत खातीही गोठवली आहेत. खात्यावर पाच-दहा हजार रुपये शिल्लक असतानाही स्वतःचे पैसे काढता येत नसल्याने शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाण्याची वेळ आली आहे. त्यामुळे बँकांनी गोठवलेली शेतकऱ्यांची खाती तात्काळ पूर्ववत करावीत, अशी मागणी अॅग्री आणि बँकेचे व्यवस्थापक त्यांच्याकडे शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी केली आहे.



यासंदर्भात बँकांचे व्यवस्थापक सचिन गांगुर्डे यांना निवेदन देण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा उपनिबंधक कार्यालय आणि अॅग्रीने बँकेकडे निवेदने देऊन शेतकऱ्यांची गोठवलेली खाती तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

दुष्काळाच्या संकटामुळे शेतकऱ्यांच्या हाताला काम नाही, शेतातील पिके उद्ध्वस्त झाली आहेत. कर्जबाजारीपणा आणि आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्यांकडे दिवाळी साजरी करण्यासाठीही पैसे नाहीत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या खात्यावर असलेली थोडीफार रक्कमदेखील त्यांना काढता येऊ नये, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. सरकारने शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याऐवजी त्यांची बँक खाती गोठवली जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

बँका, मायक्रोफायनान्स कंपन्या आणि पतसंस्थांच्या वसुलीविषयक प्रश्नांवर चर्चा करून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने संबंधित सर्व संस्थांची तातडीने बैठक आयोजित करावी. शेतकऱ्यांची नियमित बचत खाती आणि त्यातील रक्कम वापरण्यावरील निर्बंध दूर करून दिवाळीपूर्वी खाती सुरळीत करावीत, अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, बाळासाहेब मोरे, रामधन जमाले, हनुमान घोडके, ज्ञानेश्वर राऊत, नागेश मिठे, प्रवीण अनेराव,रोहिदास मस्के ,उमेश मस्के गणेश वटारे, बळीराम कदम, कृष्णा राठोड, सदाशिव मस्के, गोरख लोणकरआदी उपस्थित होते.

मुख्य लिपीक संतोष लवडकर यांचा सेवा गौरव समारंभ संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयातील मुख्य लिपीक संतोष मधुकरराव लवडकर हे आज विहीत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले त्यांचा सेवा गौरव समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व पंच परिवर्तन यांचे पूजन करून झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह अड विश्वास जोशी तर व्यासपीठावर श्री व सौ लवडकर, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य नितीन चौधरी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर



इत्यादी उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या वतीने संपूर्ण आहेर देऊन श्री व सौ लवडकर यांचा गौरव करण्यात आला तर श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयाच्या वतीने चांदीचे करंडे (भेट वस्तू) , शाल, पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. यावेळी शिवशंकर भंडारे, श्रीकांत भुसारे, सौ. संपदा लिबगावकर (लवडकर) , यांनी संतोष लवडकर यांच्या विषयी आपल्या भावना, अनुभव व्यक्त केले व भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप यांनी संतोष लवडकर यांच्या समवेतचे अनेक अनुभव कथन केले व संतोष लवडकर व लवडकर परिवारास शुभेच्छा दिल्या. केंद्रीय सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे यांनी संतोष लवडकर यांच्या कार्याचा गौरव आपल्या मनोगतातून केला व सेवानिवृत्तीनंतर चे जीवनासाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. केंद्रीय कार्यकारिणी सदस्य नितीन चौधरी यांनी संतोष लवडकर यांच्या समवेत च्या अनेक आठवणींना उजाळा दिला व संतोष लवडकर यांना शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमचे अध्यक्षीय समारोप करताना अड विश्वास जोशी यांनी संतोष लवडकर यांच्या कार्यकर्तृत्वावर अत्यंत विनोदी शैलीत प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर यांनी संतोष लवडकर यांच्या कामाचा आटोप, कार्य तत्परता, निश्चित राहून शांत डोक्याने काम करण्याची शैली सांगीतली व त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सेवा गौरव समारंभ प्रसंगी संतोष लवडकर यांचे लिखित मनोगताचे महेश लवडकर यांनी वाचन केले. यावेळी संतोष लवडकर यांच्या मातोश्री, बंधु, वहिनी, मुलगा, मुलगी, सहकुटुंब, सहपरिवार तसेच श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे पदाधिकारी, गटशिक्षणाधिकारी अधिकारी कार्यालयातील रवी आदमाने सर , लक्ष्मण पोटभरे सर, सचिन मोती सर, सिद्दीकी सर तसेच स्थानिक सर्व,सभासद, स्वातंत्र्यवीर सावरकर संकुल बीड, येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक विठ्ठल काळे सर, प्रा दिपक देशमुख सर , प्रा बालासाहेब साळवे सर, प्रा शशिकांत पसारकर सर, प्रा संतोष जोशी सर, मिलिंद वेडे सर, वांगीकर सर श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलातील सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबुराव आडे सर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक उध्दवराव नागरगोजे सर, सेवानिवृत्त पर्यवेक्षक रामचंद्र झरकर सर, नंदकुमार कुलकर्णी सर, सेवानिवृत्त अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी लवडकर यांचे आप्तेष्ट मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार पर्यवेक्षक रवींद्र खोडवे यांनी मानले, सुत्रसंचालन रोहित खिंडरे यांनी केले, कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र प्रभाकर बनसोडे यांनी सांगितला.

सहा वर्षीय वल्लभ कुलकर्णीने मोडला स्वत:चाच विक्रम!

तब्बल ४० कर्मचाऱ्यांसोबत एकाच वेळी बुद्धिबळ खेळत सर्व सामने जिंकले; ४०-० असा ऐतिहासिक निकाल

माजलगाव । प्रतिनिधी

अवघ्या सहा वर्षांच्या वयात बुद्धिबळाच्या पटावर आपल्या असामान्य बुद्धिमत्तेची आणि एकाग्रतेची चुणूक दाखवणाऱ्या छत्रपती संभाजीनगर येथील वल्लभ कुलकर्णी याने स्वत:चाच पूर्वीचा विक्रम मोडीत काढत नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.वेदांत इनोटेक प्रायव्हेट लिमिटेडच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या बुद्धिबळाच्या विशेष सायमल (उहशीी डळींश्र) स्पर्धेत वल्लभने एकाच वेळी तब्बल ४० कर्मचाऱ्यांसोबत बुद्धिबळ खेळत सर्व ४० सामने जिंकण्याची उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेचा निकाल ४०-० असा लागला.

दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी उद्योजक व खेळप्रेमी सतीश कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त या विशेष बुद्धिबळ सायमलचे आयोजन करण्यात आले होते.यापूर्वी वल्लभने एकाच वेळी २१ खेळाडूंविरुद्ध बुद्धिबळ खेळण्याचा विक्रम केला होता.मात्र, यावेळी त्याने तब्बल ४० खेळाडूंना एकाच वेळी सामोरे जात स्वत:चाच विक्रम मोडला.

एकाच वेळी ४० बुद्धिबळ पटांवरील वेगवेगळ्या परिस्थितींचे आकलन करणे, प्रत्येक पटावरील प्रतिस्पर्ध्याच्या चाली लक्षात



ठेवणे,योग्य रणनीती आखणे आणि प्रतिस्पर्ध्याला चेकमेट देणे,हे वल्लभसमोर मोठे आव्हान होते. मात्र,या सहा वर्षीय चिमुकल्याने हे आव्हान लीलया पेलले.सलग दोन तास बुद्धिबळ खेळत त्याने सर्वच्या सर्व ४० सामने जिंकून उपस्थितांना आश्चर्यचकित केले. त्याच्या या कामगिरीतून लहान वयातील असामान्य बुद्धिमत्ता, एकाग्रता आणि जिद्दीचे दर्शन घडले.या कार्यक्रमाला उद्योजक व खेळप्रेमी सतीश कल्याणकर, जालना महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष अशोक पांगरकर, एमजीएम हॉस्पिटलचे डॉ. व्यवहारे,पाठक यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना अशोक पांगरकर यांनी, वल्लभ हा संपूर्ण मराठवाड्याचा मानबिंदू आहे, अशा शब्दांत त्याचे कौतुक केले.तर सतीश कल्याणकर यांनी, वल्लभ कुलकर्णी याच्यामध्ये खूप मोठी क्षमता असून,भविष्यात तो निश्चितच मोठी कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला.

या अनोख्या बुद्धिबळ सायमलचा सर्व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त आनंद घेतला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सौरभ कुलकर्णी यांनी केले,तर या उपक्रमाची संकल्पना फिडे अर्बिटर अमरीश जोशी यांची होती. अवघ्या सहा वर्षांच्या वयात ४० प्रतिस्पर्ध्यांना एकाच वेळी पराभूत करणाऱ्या वल्लभ कुलकर्णीच्या या कामगिरीमुळे माजलगाव तालुक्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

स्व. भगवानतात्या खेडकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त ४० गरजू महिलांना पाण्याच्या टाक्यांचे वाटप

बीड । प्रतिनिधी

चकलांबा (ता. गेवराई) येथील माजी जिल्हा परिषद सदस्य स्व. भगवान तात्या खेडकर यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या मुळगावी चकलांबा येथे कुटुंबीयांनी सामाजिक बांधिलकी जपत एक स्तुत्य उपक्रम राबविला. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर गावातील ४० गरजू महिलांना पाण्याच्या टाक्याचे वाटप करण्यात आले. सध्या दुष्काळी परिस्थिती असल्याने खेडकर कुटुंबीयांनी कोणताही इतर कार्यक्रम न घेता गावातील विधवा व गरजू अशा ४० महिलांना प्रत्येकी ५०० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाक्यांचे वाटप करण्यात आले. पुण्यस्मरण कार्यक्रमाच्या निमित्त अनावश्यक खर्च टाळून गरजू महिलांच्या पाण्याच्या प्रश्नाला हातभार लावण्याचा कुटुंबीयांचा हा निर्णय ग्रामस्थांच्या विशेष कौतुकास पात्र ठरत आहे. वडिलांच्या स्मृती केवळ औपचारिक कार्यक्रमातून नव्हे, तर समाजोपयोगी कार्यातून जिवंत ठेवण्याचा हा एक आदर्श प्रयत्न असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे. स्व. भगवान तात्या खेडकर यांच्या पश्चात त्यांची मुले कार्यकारी अभियंता शिवप्रसाद खेडकर, जयदीप खेडकर, सून सौ. प्रियांका खेडकर, सरपंच, चकलांबा) व सौ. शीतल खेडकर यांनी हा उपक्रम राबविला. या उपक्रमाबद्दल गावातील तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, नागरिक आणि ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले आहे.



रामलिंग पतसंस्थेकडून सभासदांना १५ टक्के लाभांशासह दिवाळी किराणा कीटचे वाटप सामाजिक बांधिलकीतून दिवाळीची अनोखी भेट; सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण

वडवणी । प्रतिनिधी

सहकार क्षेत्रात विश्वासार्हता, पारदर्शकता आणि सामाजिक बांधिलकी जपत सभासदांच्या हिताला नेहमीच प्राधान्य देणाऱ्या वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने यंदाही दिवाळी सणाचे औचित्य साधून सभासदांना १५ टक्के लाभांशासह दिवाळी फराळासाठी आवश्यक किराणा कीटचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घोषित केल्याप्रमाणे शनिवार, दि.३१ ऑक्टोबर २०२६ रोजी या उपक्रमाचा शुभारंभ संस्थेचे चेअरमन नारायणराव डिगे यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळ व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. रोख लाभांश आणि दिवाळी फराळासाठी उपयुक्त साहित्य असलेले किराणा कीट मिळाल्याने सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून रामलिंग पतसंस्थेच्या या सामाजिक दायित्वाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

वडवणीसह संपूर्ण बीड जिल्ह्यात सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केलेल्या रामलिंग नागरी सहकारी पतसंस्थेने आर्थिक व्यवहारांसोबतच सभासदांशी जिव्हाळ्याचे नाते जपण्याची परंपरा कायम ठेवली आहे. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत यंदाही सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा तसेच दिपावली सणानिमित्त फराळासाठी किराणा कीट भेट देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. त्यानुसार दिवाळीपूर्वीच या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करत संस्थेने सभासदांना लाभांश व किराणा कीटचे वाटप सुरु केले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन नारायणराव डिगे यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते उपस्थित सभासदांना रोख लाभांश व किराणा कीट देवून या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी चेअरमन नारायणराव डिगे यांनी आपले



मनोगत व्यक्त करताना सांगितले की, रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून सभासदांच्या विश्वासावर उभी असलेली एक सहकारी परिवाराची संस्था आहे. सभासदांनी दाखविलेला विश्वास, सहकार्य आणि संस्थेवरील प्रेम हीच आमची खरी ताकद आहे. सभासदांच्या आर्थिक हिताचे संरक्षण करणे, संस्थेची आर्थिक प्रगती साधणे आणि संस्थेच्या यशाचा लाभ सभासदांपर्यंत पोहोचविणे हे आमचे नेहमीच प्राधान्य राहिले आहे. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर केल्याप्रमाणे यंदाही सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर दिवाळीचा आनंद प्रत्येक सभासदाच्या कुटुंबापर्यंत पोहोचावा, त्यांच्या सणाच्या आनंदात भर पडावी आणि सभासदांशी असलेले आपले ऋणानुबंध अधिक दृढ व्हावेत, या भावनेतून दिवाळी फराळासाठी किराणा कीटचे वाटप करण्यात येत आहे. सभासदांनी संस्थेवर असाच विश्वास आणि सहकार्य कायम ठेवावे. संस्थेच्या प्रगतीसोबतच सभासदांचे हित आणि सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी संचालक मंडळ यापुढेही कटिबध्द राहील, असे त्यांनी यावेळी नमूद केले. या कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन नारायणराव डिगे, व्हाईस चेअरमन अरुणराव गुरसाळी, व्यवस्थापक दिगांबर गुरसाळी, माजी चेअरमन कचरुशेठ झाडे, माजी व्हाईस चेअरमन सर्जेराव महाराज आळणे, माजी व्हाईस चेअरमन सुरेशराव ढवळशंक, संचालक नवनाथराव म्हेत्रे, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, सुभाषराव वाव्हळ, बाबासाहेबजी मस्के, वैजिनाथजी डिगे, रंजनाताई शिवाजीराव टकले, शैलजाताई अर्जुनराव भंडारे, शिवाजीराव टकले, अर्जुनराव भंडारे यांच्यासह सभासद नारायणराव शिंदे, गणेश जोशी, जिवन जाधव, दत्तात्रय वीर, प्रभाकर गरुड, सुरेश दिवटे, पांडुरंग बारटक्के, बालाजी आलगट, संजय खटावकर, कैलास गुरसाळी, सुधाकर सरवदे, प्रकाश लोकरे, लक्ष्मण गुरसाळी, बबनराव कुरकुटे, कोंडीराम गुरसाळी, पांडुरंग आळणे, उत्तम बागडे, जानकीराम उजगरे, सुभाष भुजबळ, प्रमोद जाधव, नामदेव झाडे, रोहित लोकरे, शंकर झाडे आदी उपस्थित होते. तसेच पतसंस्थेचे कर्मचारी सचिन म्हेत्रे, ईश्वर ढवळशंक, राहुल बागडे, अविनाश वाव्हळ, लखन टिकुळे, गणेश भुजबळ, रत्नमाला सरवदे, अरुणा पारखे, शिवाजी डिगे यांच्यासह अल्पबचत ठेव प्रतिनिधी ज्ञानेश्वर गुरसाळी, ज्ञानेश्वर डिगे, अजय भैरट, विजय हेंद्रे, केशव टकले, डिगांबर झाडे, शिवाजी लोकरे तसेच इतर सभासद व ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवाळी हा आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण आहे. या सणाच्या पार्श्वभूमीवर संस्थेने सभासदांना लाभांशाच्या माध्यमातून आर्थिक लाभ दिला असून किराणा कीटच्या माध्यमातून दिवाळी फराळासाठी आवश्यक साहित्याची भेटही दिली आहे.

पान ६ वरुन...

दुष्काळात नागरिकांना

एवढ्या दीर्घकाळापासून हा प्रकार सुरू असेल, तर अंबाजोगाई नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाला याची माहिती नाही का? माहिती असूनही कारवाई का केली जात नाही? संबंधित शेतकऱ्याला कोणाचे अभय आहे? की या प्रकाराकडे जाणीवपूर्वक अथवा अर्थपूर्ण दुर्लक्ष केले जात आहे? असे सवाल आता उपस्थित होत आहेत. आगामी पावसाळ्यापर्यंत पाण्याचा प्रश्न गंभीर राहण्याची शक्यता असताना मांजरा धरणातील उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याची गरज आहे. अंबाजोगाई शहरात नागरिकांना दहा-बारा दिवसांतून एकदा पाणीपुरवठा होत असल्याची परिस्थिती असताना, दुसरीकडे शहराच्या पाणीपुरवठा योजनेतील पाणी अनधिकृतपणे शेतीसाठी वापरले जात असल्याचा आरोप संतापजनक आहे. नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असताना शेतीसाठी पाणी उपलब्ध होत असेल, तर हा दुहेरी न्याय कशासाठी?

सौताडा येथील रामेश्वर

भक्तिभावाने प्रभू श्रीराम आणि या घोड्याची सेवा करत होते. त्यामुळे घोड्याच्या मृत्यूची बातमी समजताच परिसरातील नागरिकांमध्ये दु:खाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी

या घटनेमुळे परिसरात बिबट्याच्या वावराबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. वनविभागाने या घटनेची तातडीने दखल घेऊन बिबट्याचा शोध घ्यावा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी योग्य उपाययोजना करून त्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी सौताडा, भुरेवाडी, घुलेवाडी येथील ग्रामस्थांकडून होत आहे.

सहा वर्षांपासून वेतन थकल्याने

अडचणींमुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आल्याचे शिंदे यांनी निवेदनात म्हटले आहे. थकीत वेतन अदा करून न्याय द्यावा, अन्यथा आमरण उपोषण सुरू ठेवण्याचा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला होता. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार माजलगाव तसेच पोलीस निरीक्षक, माजलगाव पोलीस ठाणे यांना माहितीसाठी देण्यात आल्या आहेत. सहा वर्षांहून अधिक काळ काम करूनही वेतन मिळत नसल्याचा एका सफाई कामगाराचा आरोप अत्यंत गंभीर आहे. नगर परिषद प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून थकीत वेतनाबाबत योग्य निर्णय घ्यावा आणि संबंधित कर्मचाऱ्याला न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.

बीडमध्ये होणारा वीजेचा

९ सब स्टेशनला वीज पुरवठा करण्यात येत होता. त्यामुळे १३२ के.व्ही. लाईन वर लोड वाढल्याने वीजेचा लपंडाव वाढला होता. त्या अनुषंगाने आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांनी या संदर्भात वारंवार पाठपुराव्यातून २२० के.व्ही. च्या नवीन लाईनचे काम पूर्ण झाले. यामध्ये आता प्रथमत: बीड शहरातील महत्वाचे

माळीवेस सबस्टेशन आणि जालना रोड सबस्टेशन २२० के.व्ही. ला जोडले आहेत. येत्या काही दिवसांतच ग्रामीण भागातील इतरही सबस्टेशन या जोडण्यात येणार आहेत. त्यामुळे बीड शहरासह तालुक्यातील गावांच्या वीजपुरवठा खंडित होण्याची अडचण कायमस्वरूपी सुटणार आहे. दरम्यान हे काम मागील १ वर्षापासून नियमितपणे सुरू होते. तसेच यासाठी आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी निरंतर पाठपुरावा केला आहे.

दुष्काळात शेतकऱ्यांना

डॉ. सोनवणे बोलत होते. संस्थेने गेल्या ३४ वर्षांपासून सभासदांना दिवाळीनिमित्त लाभांश वाटप करण्याची परंपरा जपली आहे. यंदाही ही परंपरा कायम ठेवत सभासदांना लाभांशाचे वाटप करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या आर्थिक प्रगतीची माहिती देताना डॉ. सोनवणे म्हणाले की, संस्थेच्या ठेवी सध्या १०४ कोटी रुपयांवर पोहोचल्या असून, ६७ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. संस्थेला सुमारे आठ हजार सभासद असून, आष्टी तालुक्यातील पाच शाखांच्या माध्यमातून सभासदांना सेवा दिली जात आहे. संस्थेने ५० टक्के सोनेतारण कर्जाचेही वाटप केले आहे. संस्थेच्या आर्थिक स्थितीचा विचार करून सभासदांना लाभांश वाटप करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ज्येष्ठ संचालक सुखलाल मुथा व त्र्यंबक इजारे यांनी संस्थेच्या कामकाजाचा आणि प्रगतीचा आढावा घेतला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सभासदांना लाभांशाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला डॉ. विलास सोनवणे, नवनीत कटारिया, सुखलाल मुथा, सय्यद अश्फाक, डॉ. सुजय सोनवणे, बबन बन, दादासाहेब खाडे, तुषार चोपडा यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, संचालक व सभासद उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आनंद शेलार, संभाजी काकडे, प्रशांत पोकळे, प्रशांत भापकर, शहादेव भोसले, विशाल जाधव, विशाल शेठी, हरिभाऊ थोरात, सतीश भापकर, ज्योती औटे, मनीषा सोले, अभिषेक श्रीखंडे, सागर भोसले, ज्ञानेश्वर इंगवले, शुभम पोकळे, दादासाहेब इंगवले, हरिदास झरट व ज्ञानेश्वर पवार यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अमोल जगताप यांनी केले, तर आभार संस्थेचे सचिव काकासाहेब पोकळे यांनी मानले.

शेतकऱ्यांच्या पाठीशी महेश कारखाना

आणि संबंधितांनी कारखान्याच्या प्रगतीसाठी एकजुटीने काम करावे, असे आवाहन माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी केले.

मतदारसंघातील पाणीप्रश्नावर बाळासाहेब अजबे यांचे मार्गदर्शन

आष्टी मतदारसंघातील पाणीप्रश्न हा शेती आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा विषय आहे. या प्रश्नावर माजी आमदार बाळासाहेब अजबे यांनी आपले विचार मांडत पाणीप्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले.

साखर उद्योगात आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आवश्यक

बदलत्या काळात साखर उद्योगासमोर नवी आव्हाने निर्माण होत आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि उद्योगातील बदलांशी जुळवून घेणे आवश्यक आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी मार्गदर्शन केले.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि.३ नोव्हेंबर २०२६
४

मराठवाड्यातील दुष्काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे - मुख्यमंत्री फडणवीस

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी मराठवाड्यातील उद्योजकांनी पुढाकार घेत आज ६ कोटी १८ लाख रुपयांचा धनादेश दिल्याबद्दल आभार व्यक्त करताना बळीराजाच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगर येथे दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त देवेंद्र सेवा महोत्सव समितीच्या वतीने १ नोव्हेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील जबिंदा मैदान, बीड बायपास येथे 'प्रौढ प्रताप पुरंदर' या ऐतिहासिक महानाट्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातून शेतकऱ्यांना नवी प्रेरणा आणि बळ मिळणार आहे. छत्रपतींच्या विचारांवर शासन काम करीत असून, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमास राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, खासदार संदीपान भुमरे, आमदार अनुराधा चव्हाण आणि जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार नारायण कुचे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच जगद्गुरू श्रीमद्? रामानंदाचार्य



नरेंद्राचार्यजी, ह.भ.प. भास्करगिरी महाराज, महंत रामगिरी महाराज, श्री महंत शिवाजी महाराज आणि ह.भ.प. महंत विष्णू महाराज शास्त्री यांची विशेष उपस्थिती होती.मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई, चारा उपलब्धतेचा प्रश्न तसेच शेतकऱ्यांसमोरील अडचणी लक्षात घेऊन शहरातील उद्योजकांनी सामाजिक बांधिलकीतून मदतनिधी संकलित केला. या उपक्रमातून संकलित झालेला ६ कोटी १८ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुपूर्द करण्यात आला. संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या मदतीसाठी उद्योजकांनी दाखविलेली एकजूट महत्त्वपूर्ण असल्याचे मुख्यमंत्री यांनी नमूद केले.छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातून संघर्ष, स्वाभिमान, लोककल्याण आणि शेतकरीहिताचा विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहनही मुख्यमंत्री यांनी केले. छत्रपतींच्या विचारांचा वारसा स्मरणात ठेवण्यासाठी त्यांनी हजारोंच्या समुदायाला साद घातली. तत्कालीन परिस्थितीचे स्मरण करून शिवरायांचा पराक्रम, त्यांचा संघर्ष आणि स्वराज्यनिर्मितीमागील प्रेरणा जाणून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. छत्रपतींच्या विचारांवर आधारित लोककल्याणकारी शासनाची भूमिका असून, शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या महानाट्याचे लेखन, दिग्दर्शन आणि निर्मिती महेंद्र वसंतराव राजेमहाडिक यांनी केली. हजारोंच्या संख्येने उपस्थित नागरिकांनी या ऐतिहासिक महानाट्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.मुख्यमंत्र्यांनी मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांसोबत या नाट्याचा आस्वाद घेतला. जवळवास १५ हजारावर प्रेक्षक उपस्थित होते.देवेंद्र सेवा महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र साबळे पाटील यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमाने ऐतिहासिक वारशाचे स्मरण आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी उद्योजकांनी दिलेले योगदान मराठवाड्यातील सामाजिक एकजुटीचे प्रतीक ठरले.कार्यक्रमाच्या प्रारंभी विविध संस्थांच्या महंतांचे पाद्यपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच देवेंद समितीच्या वतीने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी एक हजार पाण्याच्या टाक्या व महिला सक्षमीकरिता ५०० शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८१७ : कॅनडातील सर्वात जुनी चार्टर्ड बँक बँक ऑफ मॉन्ट्रियल सुरु झाली.
१९३८ : पाचे इंग्लिश दैनिक 'द बॉम्बे टाइम्स अँड जर्नल ऑफ कॉमर्स' या नावाने मुंबईत सुरू झाले.
१९०३ : पनामा (कोलंबियापासुन) स्वतंत्र झाला.
१९११ : शेवरोलेट ऑटोमोबाइल कंपनी सुरु झाली.
१९१३ : अमेरिकेत 'आय कर' सुरू झाला.
१९१८ : पोलंड (रशियापासुन) स्वतंत्र झाला.
१९४४ : भारतीय संगीत प्रचारक मंडळातर्फे पुण्यात अखिल भारतीय संगीत परिषदेस सुरुवात.
१९४९ : वाढत्या किमती विरुद्ध निषेध व्यक्त करण्याकरता पुण्यात बाराशे स्त्रियांचा कलेक्टर कचेरीवर मोर्चा.
१९५७ : रशियाच्या 'स्पुटनिक-२' या अंतराळयानातून गेलेली 'लायका' नावाची कुत्री ही अंतराळभ्रमण करणारी पहिली सजीव ठरली. मात्र प्रक्षेपणानंतर काही तासांतच ती मृत्यूमुखी पडली.
१९८८ : श्रीलंकेतून आलेल्या भाडोत्री तामिळ सैनिकांनी मालदीववर हल्ला केला. तेथील सरकारच्या विनंतीवरुन भारतीय सैन्याने तो मोडून काढला व सरकार वाचवले
२०१४ : वन वर्ल्ड ट्रेड सेंटर अधिकृतपणे सुरु झाले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८८ : सवाई जयसिंग जयपूर संस्थानचा राजा (मृत्यू: २१ सप्टेंबर १७४३)
१९०० : ॲडिडास चे संस्थापक एडॉल्फ डॅस्लर यांचा जन्म. (मृत्यू: ६ सप्टेंबर १९७८)
१९०१ : पृथ्वीराज कपूर अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक (मृत्यू: २९ मे १९७२)
१९१७ : भारतीय स्वतंत्रसैनिक अन्नपूर्णा महाराणा यांचा जन्म. (मृत्यू: ३१ डिसेंबर २०१२)
१९२१ : चार्ल्स ब्रॉन्सन अमेरिकन अभिनेता (मृत्यू: ३० ऑगस्ट २००३)
१९२५ : प्रबंधलेखक, संपादक डॉ. हे. वि. इनामदार यांचा जन्म.
१९३३ : अमर्त्य सेन कल्याणाभिमुख अर्थशास्त्र व सामाजिक पर्याय सिद्धान्त या विषयांतील कार्यासाठी नोबेल पारितोषिक विजेते (१९९८) अर्थशास्त्रज्ञ
१९३७ : लक्ष्मीकांत शांताराम कुडाळकर चित्रपटसृष्टीत चार दशके लोकप्रिय संगीत देणाऱ्या 'लक्ष्मीकांत-प्यारेलाल' या जोडीतील संगीतकार (मृत्यू: २५ मे १९९८)
१९५४ : लक्ष्मीकांत बेर्डे अभिनेता (मृत्यू: १६ डिसेंबर २००४)

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१९ : अनंत फंदी शाहीर, 'फटका'कार, गोंधळी (जन्म: ? ? १७४४)
१८९० : स्विस नॅशनल कौन्सिलचे पहिले अध्यक्ष ओरिचिक ओशेनेबेविन यांचे निधन. (जन्म: २४ नोव्हेंबर १८११)
१९९० : मनमोहन कृष्ण चरित्र अभिनेता (जन्म: २६ फेब्रुवारी १९२२)
१९९२ : प्रेम नाथ हिन्दी चित्रपटात नायक व खलनायकाच्या भूमिका गाजवणारे अभिनेते (जन्म: २१ नोव्हेंबर १९२६)
१९९८ : डॉ. आर. सी. हिरेमठ कन्नड साहित्यिक, कर्नाटक विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: १५ जानेवारी १९२०)
१९९८ : बॅटमॅन पत्राचे निर्माते बॉब केन यांचे निधन. (जन्म: २४ ऑक्टोबर १९१५)
२००० : प्रा. गिरी देशिंगकर चीनविषयक तज्ञ आणि पूर्व आशियाई घडामोडींचे अभ्यासक (जन्म: ? ? ????)
२०१२ : कैलाशपती मिश्रा गुजरातचे राज्यपाल (जन्म: ५ आक्टोबर १९२३)

शेळ्या-बकऱ्यांमध्ये टीपीआर रोगाच्या संक्रमणाची भीती



सध्या देशात वारंवार हवामान बदलत आहे. या बदलाचा झाडे-वनस्पतींबरोबरच गुरांवरही परिणाम होऊ शकतो. विशेषत: शेळ्या-बकऱ्यांमध्ये टीपीआर रोगाच्या संक्रमणाची भीती असते. कडाक्याचा उन्हाळा आणि अधूनमधून पाऊस अशा परिस्थितीत जनावरे आजारी पडण्याचा धोका वाढतो. विशेषत: उघड्यावर चरायला जाणाऱ्या शेळ्या, गायी आणि म्हशींना त्रास होऊ शकतो. या काळात ते संक्रमित प्राण्यांच्या संपर्कात येतात आणि आजारी पडतात. त्यामुळे या हंगामात जनावरांची काळजी घेण्याबाबत शेतकऱ्यांना सल्ला देण्यात येत आहे.

सरकारनं पशुपालकांसाठी जारी केलेल्या डव्हायझरीमध्ये असं म्हटलं आहे की, शेळ्यांमध्ये टीपीआर रोगाची लागण होण्याची शक्यता सर्वाधिक असते. या रोगाची लागण झाल्यावर योग्य उपचार न मिळाल्यानं अनेकदा शेळ्यांचा मृत्यू होतो. हा रोग टाळण्यासाठी प्रत्येक शेळीला टीपीआर लस द्यावी. एक मिलिलिटरची ही लस शेळ्यांच्या त्वचेवर लावली जाते. ज्या शेळ्यांचे वय तीन महिन्यांपेक्षा कमी आहे किंवा गाभण असलेल्या शेळ्यांना ही लस टोचू नये. या आजारापासून बचाव करण्यासाठी जनावरांना सूर्यप्रकाशापासून संरक्षण द्यावं आणि त्यांना पिण्यासाठी पुरेसं पाणी द्यावं. टीपीआर रोगाची लागण झालेल्या जनावरांना खूप ताप येतो. तोंडात फोड येतात. बाधित शेळीच्या डोळ्यातून व नाकातून पाणी येतं, जुलाब आणि न्यूमोनियाची लक्षणं दिसतात.

शाश्वत उत्पन्नाचा स्रोत; लिंबू लागवड



महाराष्ट्रात कागदी लिंबूची लागवड हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर आणि शाश्वत उत्पन्नाचा स्रोत मानला जातो. एकदा लागवड केल्यानंतर झाड २० ते २५ वर्षे सतत उत्पन्न देते. लिंबू लागवडीची संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे:

हवामान आणि जमीन :हवामान: लिंबू पिकासाठी उष्ण व कोरडे हवामान सर्वोत्तम असते. जास्त थंडी किंवा दाट धुक्यामुळे फळधारणेवर परिणाम होतो. जमीन: मध्यम ते काळी, हलकी, मुरमाड आणि पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन योग्य ठरते. जमिनीचा सामू (कि) ६.५ ते ७.५ दरम्यान असावा.

प्रमुख सुधारित जाती :साई सरबती : महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेली जात. रसदार फळे, खैऱ्या रोगास प्रतिकारक. फुले शरबती: अधिक उत्पादन देणारी, मोठी आणि पिवळीधमक फळे असणारी जात. विक्रम व प्रमुलिनी: भरपूर फळधारणा आणि चांगला रस असणारे वाण. बालाजी: आंध्र प्रदेश कृषी विद्यापीठाचे खैऱ्या रोगास उत्तम प्रतिकारक वाण.

लागवडीचे अंतर व पद्धत :अंतर: ६ बाय ६ मीटर (प्रति एकरी सुमारे ११-११२ झाडे) किंवा सघन लागवडीसाठी ५ बाय ५ मीटर अंतर ठेवावे. खड्ड्यांचे प्रमाण: ७५ ह्न ७५ ह्न ७५ सेंमी आकाराचे खड्डे खणावेत. खड्डा भरणे: खड्ड्यात १०-१५ किलो चांगले कुजलेले शेणखत, १-२ किलो सिंगल सुपर फॉस्फेट, १ किलो निंबोळी पेंड आणि २५ ग्रॅम ट्रायकोडर्मा मातीत मिसळून भरावे.

खत आणि पाणी व्यवस्थापन :पाणी व्यवस्थापन: लिंबासाठी ठिबक सिंचन सर्वोत्तम आहे. उन्हाळ्यात ५ ते ७ दिवसांच्या अंतराने आणि हिवाळ्यात १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. खत मात्रा (पूर्ण वाढ झालेल्या झाडासाठी): शेणखत: ४० ते ५० किलो/झाड/वर्ष. रासायनिक खते: ५०० ग्रॅम नत्र, २५० ग्रॅम स्फुरद, आणि २५० ग्रॅम पालाश प्रति झाड दोन हप्त्यांत (जानेवारी आणि ऑगस्ट) द्यावे.

बहर व्यवस्थापन :लिंबाला वर्षातून ३ वेळा बहर येतो: आंबे बहर: जानेवारी - फेब्रुवारी फलोत्पादन (मे-जूनमध्ये फळे मिळतात). मृग बहर: जून - जुलै फलोत्पादन (ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये फळे मिळतात). हस्त बहर (सर्वात फायदेशीर): सप्टेंबर - ऑक्टोबर फुलोरा. याची फळे मार्च ते मे (उन्हाळ्यात) बाजारात येतात, जेव्हा लिंबाला सर्वाधिक ५० ते १०० रु./किलो दर मिळतो.

प्रमुख रोग व कीड नियंत्रण :खैऱ्या रोग पानांवर व फळांवर तांबूस खरबरीत डाग पडतात.कॉपर ऑक्सिक्लोराईड (३ ग्रॅम) + स्ट्रेप्टोसायक्लीन (०.५ ग्रॅम) प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा. डिंक्या रोग खोडातून तांबडा-तपकिरी डिंक बाहेर येतो. खोडावरील डिंक खरवडून त्यावर बोर्डो पेस्ट लावा. फुलपाखरू/अळी अळ्या कोवळी पाने खातात.निंबोळी अर्क ५% किंवा क्विनॉलफॉस फवारा.उत्पादन आणि उत्पन्न :उत्पादन: लागवडीनंतर ३ ते ४ वर्षांनी फळे मिळण्यास सुरुवात होते. ५ वर्षांनंतर पूर्ण वाढ झालेले १ झाड वर्षाला १,०००ते १,५०० फळे (सुमारे ८० ते १०० किलो) देते. उत्पन्न: एका एकरातून सरासरी १० ते १५ टन वार्षिक उत्पादन मिळते. खर्च वजा जाता प्रति एकरी १.५ ते २.५ लाख निव्वळ नफा मिळू शकतो.

रब्बी हंगामात कांद्याच्या या जाती बघा अजमावून

महाराष्ट्रातील हवामान वर्षभर म्हणजेच खरीप, रांगडा आणि रब्बी हंगामात कांदा लागवडीस पोषक असते. भारतात विविध सरकारी आणि खासगी संस्थांनी कांद्याचे सुमारे ७० वाण विकसित केले आहे. मात्र त्यातील फारच थोडे वाण व केवळ ३० टक्के क्षेत्रामध्ये लागवडीखाली आहेत.

बहुतांश शेतकरी आजही स्वतः तयार केलेल्या बियाण्यांची लागवड करतात. अशा प्रकारे स्वतःचे कांदा बीजोत्पादन करतेवेळी शास्त्रीय पद्धतीने व योग्य ते नियम पाळून केले पाहिजे. मात्र अनेक शेतकऱ्यांकडून बीजोत्पादनाचे नियम पाळले जात नाहीत. अनेक जण चांगले कांदे बाजारात विकून खराब कांदे बीजोत्पादनासाठी वापरतात. त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या वाणांमध्ये नकळतपणे निकृष्टपणा येत असतो. त्या पेक्षा शिफारस केलेल्या सुधारित वाणाचे बियाणे शेतकऱ्यांनी वापरल्यास उच्च प्रतीच्या कांद्याचे उत्पादन घेता येते. रब्बी हंगामासाठी पुढील पैकी योग्य त्या गुणधर्माच्या कांदा वाणांची निवड करावी.

लाल रंगाच्या कांद्याच्या प्रमुख जाती :

एन २-४-१ : पिंपळगाव-बसवंत येथील संशोधन केंद्राने विकसित केलेल्या एन २-४-१ या वाणाचे कांदे गोल आणि मध्यम ते मोठ्या आकाराचे असतात. रंग विटकरी, चव तिखट असून कांदे ५ ते ६ महिन्यांपर्यंत साठवून ठेवता येतात. या कांद्यांमध्ये विद्राव्य घन पदार्थांचे प्रमाण १३ ते १४ टक्क्यांपर्यंत असते. लागवडीनंतर १२० दिवसांनी कांदे काढणीस येतात. या कांद्याचे हेक्टरी उत्पादन ३० ते ३५ टन येते. पुसा रेड : दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेने विकसित केलेल्या या कांदा वाणाचा कांदा गोलाकार चपटा असून रंगाने गडद लाल असतो. त्यात विद्राव्य घन पदार्थांचे प्रमाण १३ - १४ टक्के असते. कांद्याचे उत्पादन हेक्टरी २५ ते ३० टन येते. लागवडीनंतर कांदे काढणीस १२५ ते १४० दिवसांनी येतात. अर्का निकेतन : बंगलोर स्थित भारतीय



उद्यानविद्या संशोधन संस्थेने कांद्याची अर्का निकेतन ही जात नाशिक येथील वाणातून विकसित केली आहे. कांदे गोलाकार, बारीक मानेचे आणि आकर्षक गुलाबी असतात. चव तिखट असून, कांदे साठवणीत ५ ते ७ महिने टिकतात. कांदे लागवडीनंतर ११० ते १२० दिवसांनी काढणीस येतात. हेक्टरी ३० ते ४० टन इतके उत्पादन होते. ग्रिफाउंड लाइट रेड : नाशिकमधील राष्ट्रीय बागवानी संस्थेने विकसित केलेल्या या वाणाचे कांदे गोल, मध्यम ते मोठे आणि चवीला तिखट असतात. कांद्यांमध्ये विद्राव्य घन पदार्थांचे प्रमाण १३ टक्के असते. लागवडीपासून १२० ते १२५ दिवसांत कांदा तयार होतो. या कांद्यांपासून हेक्टरी ३० ते ३५ टन उत्पादन मिळते. साठवणुकीसाठी हे वाण चांगले आहे. भीमा किरण : कांदा व लसूण संशोधन संचालनालयाने विकसित केलेल्या या वाणाचे कांदे अंडाकृती, बारीक मानेचे आणि लाल रंगाचे असतात. यामध्ये विद्राव्य घन पदार्थांचे प्रमाण १२ टक्के असते. लागवडीपासून कांदे १३० दिवसांमध्ये तयार होतात. साठवणुकीत ५ ते ६ महिने टिकतात. या कांद्यांपासून हेक्टरी ४० टन उत्पादन मिळते. भीमा शक्ती : कांदा व लसूण संशोधन संचालनालयाने विकसित केलेल्या या वाणाचे कांदे आकाराने गोल, आकर्षक लाल असून, त्यांची साठवणक्षमता चांगली आहे. कांदे लागवडीनंतर १३० दिवसांनी काढणीस येतात. कांद्यांमध्ये विद्राव्य घन पदार्थांचे प्रमाण १२ टक्के असते. या कांद्यांपासून हेक्टरी ४० ते ४५ टन इतके उत्पादन मिळू शकते. भीमा रेड : कांदा व लसूण संशोधन संचालनालयाने रब्बी हंगामासाठी विकसित केलेल्या या वाणाचे पुनर्लागवडीनंतर ११५ दिवसांनी काढणीस येतात. सरासरी विक्रीयोग्य उत्पादन हेक्टरी ३० ते ३२ टन मिळते. या वाणाची साठवणक्षमता काढणीनंतर तीन महिन्यांपर्यंत आहे. हे वाण फुलकिड्यांसाठी काही प्रमाणात सहनशील आहे. भीमा लाइट रेड : कांदा व लसूण संशोधन संचालनालयाने रब्बी हंगामासाठी विकसित केलेल्या या वाणाचे कांदे गोलाकार आणि फिकट लाल रंगाचे असतात. पुनर्लागवडीनंतर ११० ते १२० दिवसांत कांदे काढणीस तयार होतात. या वाणाच्या कांद्याचे सरासरी विक्रीयोग्य उत्पादन हेक्टरी ३८ टन होते. या वाणाची साठवणक्षमता काढणीनंतर तीन महिन्यांपर्यंत आहे. भीमा राज : कांदा व लसूण संशोधन संचालनालयाने विकसित केलेल्या वाणाचे कांदे लागवडीनंतर ११५ ते १२० दिवसांमध्ये काढणीस येतात. रब्बी हंगामामध्ये या वाणाचे उत्पादन हेक्टरी २५ ते ३० टन येते. साठवणीत या वाणाचे कांदे २ ते ३ महिने टिकतात. हे वाण फुलकिडे आणि बुरशीजन्य रोगांसाठी काही प्रमाणात सहनशील आहे.

पांढऱ्या कांद्याचे विविध वाण : भीमा श्वेता : कांदा व लसूण संशोधन संचालनालयाने विकसित केलेल्या या वाणाचे कांदे गोलाकार असून त्यांचा रंग आकर्षक पांढरा असतो. या कांद्यांमध्ये विद्राव्य घन पदार्थांचे प्रमाण १२ टक्के असून, पुनर्लागवडीनंतर १०५ दिवसांत कांदे काढणीस येतात. हेक्टरी ३५ टन उत्पादन मिळते. कांदे साठवणुकीत ३ महिन्यांपर्यंत टिकतात. पुसा व्हाइट राउंड : दिल्लीतील भारतीय कृषी संशोधन संस्थेने विकसित केलेल्या या वाणाचे कांदे मध्यम आकाराचे असून रंग पांढरा असतो. ही जात प्रक्रिया उद्योगासाठी चांगली आहे. या वाणांच्या कांद्यांमध्ये विद्राव्य घन पदार्थांचे प्रमाण १३ ते १५ टक्के असते. हेक्टरी २० ते २५ टन उत्पादन मिळते. पुसा व्हाइट फ्लॅट : भारतीय कृषी संशोधन संस्थेने विकसित केलेला हा वाण प्रक्रिया उद्योगासाठी चांगला आहे. या वाणाचे कांदे चपटे गोल असतात. या वाणापासून हेक्टरी २० ते २५ टन उत्पादन मिळते. फुले सफेद : महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या या वाणाचे कांदे मध्यम, गोल आणि चमकदार पांढऱ्या रंगाचे असतात. हे वाण प्रक्रिया उद्योगासाठी चांगले आहे. या वाणामध्ये विद्राव्य घन पदार्थांचे प्रमाण १३ ते १४ टक्के असते. या वाणाचे हेक्टरी उत्पादन २० ते २५ टन असून कांदे साठवणुकीत २ ते ३ महिने टिकतात.

गावरान कोंबड्यांच्या 'या' प्रजाती पाळा; कुक्कुटपालनातून मिळेल भरघोस नफा!



सध्या शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन व्यवसायासोबत कुक्कुटपालन व्यवसाय देखील मोठ्या प्रमाणात केला जात आहे. सध्या पोल्ट्री उद्योग-व्यवसायिक दृष्टिकोनातून मोठ्या प्रमाणात केला जात आहे. सध्या पोल्ट्री व्यवसायात कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग ही संकल्पना खूप मोठ्या प्रमाणात पुढे आले असून, या माध्यमातून ब्रॉयलर कोंबड्यांचे पालन मोठ्या प्रमाणात होत आहे. परंतु बरेच शेतकरी स्वतः सगळ्या प्रकारचा खर्च करून विविध प्रकारच्या गावरान कोंबड्यांचे देखील पालन करत आहेत.

पोल्ट्रीसाठी गावरान कोंबड्यांच्या जाती :देहलम रेड कोंबडी : या जातीच्या कोंबड्या एका वर्षाला दोनशे ते दोनशे वीस अंडी देतात. गिरीराज कोंबडी : गिरीराज कोंबडीचे (झेंीश्रींू ऋशीळपस) सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे दोन महिन्यात एक किलो इतक्या वजनाच्या होत असतात. मांस विक्रीसाठी गिरीराज कोंबडी खूप फायदेशीर आहे. जर आपण गिरीराज कोंबडीचे अंडे उत्पादनाचा विचार केला तर या जातीच्या कोंबड्या थोड्या इतर जातींपेक्षा महागडा ठरतात कारण या जातीच्या कोंबड्या एकाचक्रा दीडशे अंडी देत असतात. वनराज : या जातीच्या कोंबड्या दोन महिन्यात एक किलो वजनाच्या होतात अंडी मात्र इतर जातींपेक्षा कमी देतात. एका चक्रात १२० ते १६० अंडी देतात. कडकनाथ : ही जात सर्वाधिक प्रसिद्ध असून या कोंबडीमध्ये अनेक प्रकारचे औषधी गुणधर्म असल्यामुळे या कोंबडीला विशेष मागणी आहे. परंतु या जातीच्या कोंबड्यांचे इतर जातींच्या कोंबड्यांच्या तुलनेत खूप कमी वेगात वजन वाढते. पाच महिन्यात या कोंबड्यांचे वजन फक्त एक किलो होते व दर चक्रात कोंबड्या फक्त साठ अंडी देतात. परंतु या कोंबडीच्या अंड्याला आणि मांसाला भरपूर मागणी असल्यामुळे कडकनाथ पालनासाठी खूप महत्वपूर्ण आहे. आरआयआर : गावरान कोंबड्यांमध्ये प्रसिद्ध असलेली ही जात आहे. परंतु या जातीच्या कोंबड्या पासून मिळणारे अंड्यांचे उत्पादन उशिरा मिळते. गावरान अंड्यांना बाजारपेठेत आणि रिटेल विक्री मध्ये देखील अधिक भाव मिळतो. ही कोंबडी एकाचक्रात २२० ते २५० अंडी देते. ब्लॅक अस्ट्रालॉर्प : ही कोंबडी सगळ्यात महत्त्वाची असून या प्रजातीच्या कोंबडीचे तीन महिन्यात दोन किलो वजन वाढते. तसेच अंडी उत्पादनासाठी देखील ही प्रजाती चांगले असून एका चक्रात १६० ते २०० अंडी देते.

दुष्काळग्रस्त परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर काम करावे-आ. बबनराव लोणीकर

जालना । प्रतिनिधी

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, पशुधन आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर उपाययोजना कराव्यात, असे प्रतिपादन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. त्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित आढावा बैठकीत दुष्काळ निवारण, कर्जमाफी, नवीन पीक कर्ज, पाणीपुरवठा, वीज वितरण आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचला पाहिजे. केवळ कागदोपत्री कार्यवाही न करता प्रत्यक्ष जमिनीवर परिणाम दिसला पाहिजे, अशी भूमिका आमदार बबनराव लोणीकर यांनी मांडली.कर्जमाफी आणि नवीन पीक कर्जाच्या अंमलबजावणीचा आढावा घेताना पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ तातडीने मिळावा आणि बँकांनी नवीन पीक कर्ज वितरणात कोणतीही दिरंगाई करू नये, यावर भर देण्यात येणार आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची कर्जवसुली स्थगित करणे, पीक विमा भरपाई, नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे आणि आवश्यक आर्थिक मदत याबाबत



संबंधित विभागांनी कार्यवाही करावी. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवावीत. जनावरांसाठी चारा डेपो, चारा छावण्या, पिण्याचे पाणी आणि पशुधनाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. दुष्काळ निवारणासाठी मंजूर निधीचा योग्य विनियोग करून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळवून द्यावी, असे निर्देश आमदार बबनराव लोणीकर देणार आहेत.

निम्न दुधना प्रकल्पाच्या गाळपेर क्षेत्राचा आढावा घेताना उपलब्ध सुमारे तीन हजार हेक्टर जमिनीवर चारा लागवडीसाठी विशेष नियोजन करण्याची आवश्यकता आमदार लोणीकर व्यक्त करणार आहेत. गाळपेर क्षेत्रातील शेतकऱ्यांना मका, कडवळ व इतर चारा पिकांचे बियाणे उपलब्ध करून देणे, रोजगार हमी योजनेतून आवश्यक कामे राबविणे आणि सिंचनासाठी वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे. परतूर तालुक्यातील १७३ गावांची वाटर ग्रीड, मंठा तालुक्यातील ९५ गावांची वाटर ग्रीड आणि १२० गावांच्या सुधारित पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेण्यात येणार आहे. पाणीपुरवठा योजनांची सद्यस्थिती, पंपांची कार्यक्षमता, विद्युत देयके, जलस्रोतांची उपलब्धता आणि प्रलंबित कामे तपासून प्रत्येक गावाला नियमित व शुद्ध पाणी मिळावे, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.वीज वितरण कंपनीच्या कामकाजाचा आढावा घेताना कृषी पंपांना वीजपुरवठा, रोहित्रांची उपलब्धता, वीज जोडणीची प्रलंबित प्रकरणे आणि ग्रामीण भागातील अखंडित वीजपुरवठ्याबाबत चर्चा करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या योजनांना प्राधान्याने वीजपुरवठा करावा, शेतकऱ्यांच्या वीजविषयक तक्रारींचे तातडीने निराकरण करावे आणि आवश्यक दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करावीत. जिल्हा नियोजन मंडळांतर्गत मंजूर कामे, निधी वितरण, खर्च आणि प्रलंबित विकासकामांचा विभागनिहाय आढावा घेण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते, पूल, शासकीय इमारती आणि इतर विकासकामे दर्जेदार व निर्धारित वेळेत पूर्ण करावीत. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ग्रामीण आरोग्य केंद्रे, औषधसाठा, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपलब्धता आणि दुष्काळजन्य आजारांवरील प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर विशेष लक्ष देण्यात येणार असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.वन विभाग आणि सामाजिक वनीकरण विभागाने वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन, जलसंधारण आणि वन्यजीवांसाठी पाण्याच्या उपलब्धतेबाबत प्रभावी उपाययोजना कराव्यात. पंचायत समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या घरकुल, रोजगार हमी, स्वच्छता, ग्रामविकास आणि इतर योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना वेळेत मिळावा, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. कृषी विभागाने पीक विमा, कृषी यांत्रिकीकरण, सूक्ष्म सिंचन, बियाणे व खतांची उपलब्धता, शेतकरी मार्गदर्शन आणि विविध अनुदान योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी. सर्व विभागांनी मंजूर निधी, झालेला खर्च, प्रलंबित कामे आणि पुढील कार्यवाहीचा कालबद्ध कृती आराखडा सादर करावा. दुष्काळ निवारण आणि विकासकामांच्या अंमलबजावणीत कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही, तसेच शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी प्रशासनाने जबाबदारीने काम करावे, असे आवाहन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. यावेळी बैठकीला उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, आष्टी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शत्रुघ्न कणसे भाजपा युवा मोर्चा जालना जिल्हाध्यक्ष संपत टकले, परतूर तहसीलदार भारत गंगावणे मंठा तहसीलदार श्रीमती सुमन मोरे मंठा तालुका कृषी अधिकारी दयानंद वाघमोडे मंठा गटविकास अधिकारी पवार परतुर गटविकास अधिकारी कौशल पाटील, जालना तालुका कृषी अधिकारी श्री राठोड, परतुर तालुका कृषी अधिकारी श्रीमती साळवे, जीवन प्राधिकरण चे उपअभियंता धनवडे, पद्माकर कवडे भागवत मानवतकर गजानन कुकडे सहाय्यक निबंधक परतुर व मंठा पशुसंवर्धन अधिकारी शशिकांत शिंदे यांच्यासह कृषी पंचायत सार्वजनिक बांधकाम आरोग्य वीज वितरण महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सर्व बँकांचे मॅनेजर यांच्यासह अधिकारी कर्मचारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संत ज्ञानेश्वर विद्यालयात दिवाळीनिमित्त आकाशकंदील निर्मिती कार्यशाळा संपन्न

पाथर्डी। प्रतिनिधी

संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय पाथर्डी येथे दिवाळी सणाचे औचित्य साधून इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आकाशकंदील निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने व कल्पकतेने विविध रंगांचे आकर्षक आकाशकंदील तयार केले यावेळी शालेय पोषण आहार अधीक्षक रामनाथ कराड पाथर्डी पंचायत समिती व त्यांचे सहकारी उपस्थित होते विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले संस्थेचे सचिव महेंद्र शिरसाट मुख्याध्यापक सुरेश मिसाळ व पर्यवेक्षक आत्माराम दहिफळे सर



यांनीही विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे विशेष कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला कलात्मक कौशल्याला आणि कृतीतून शिकण्याच्या वृत्तीला चालना मिळते विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या आकाशकंदिलांमुळे शाळेतील दिवाळीचा आनंद अधिकच द्विगुणित झाला.

बाबुजी आव्हाड महाविद्यालय येथे राष्ट्रीय एकता दिन साजरा

पाथर्डी । प्रतिनिधी

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने (एन.सी.सी.) भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात १७ महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रदीपकुमार बेहरा व ॲडम ऑफिसर कर्नल निकेत नेगी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा करण्यात आला राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील श्री तीलोक जैन विद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्रांची सायकल रॅली काढण्यात आली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बबन चौरे यांनी सायकल राहिलेला हिरवा झेंडा दाखवून भारतामध्ये शांतता एकता व अखंडता टिकवण्याची प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे असा संदेश दिला भारत माता की जय जय



जवान जय किसान वंदे मातरम यासारख्या विविध घोषणांनी शहर परिसर दुमदुमून टाकला या कार्यक्रमास श्रीतीलोक जैन विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी उपप्राचार्य भारत गाडेकर उपस्थित होते या कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन अजयकुमार पालवे व चीप ऑफिसर बाळासाहेब गांगुर्डे यांनी केले.

ऊसतोड कामगारांच्या व्यथेची मध्य प्रदेश राज्यात दखल

'युद्ध पेटले आहे' कवितासंग्रहास कविवर्य वसंत राशिनकर पुरस्कार'

ऊसतोड कामगारांच्या मूक व्यथा वेदनांचा आक्रोश अत्यंत भेदक व निर्भीडपणे मांडणाऱ्या बाळासाहेब नागरगोजे लिखित ' युद्ध पेटले आहे ' कवितासंग्रहास देश पातळीवरील अत्यंत प्रतिष्ठेचा 'कविवर्य वसंत राशिनकर स्मृति अखिल भारतीय काव्य साधना पुरस्कार २०२५' मध्य प्रदेश साहित्य अकादमीचे निदेशक डॉ. विकास दवे यांच्या हस्ते इंदौर येथे 'आपले वाचनालय ' च्या सभागृहात ३१ ऑक्टो. रोजी सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला आहे.

'युद्ध पेटले आहे ' कवितासंग्रह



'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ ' - मुंबई (महाराष्ट्र शासन) यांच्या अनुदानातून प्रकाशित झालेला आहे. या कवितासंग्रहाने अल्पावधीतच साहित्य वर्तुळात स्वतःचे स्थान निर्माण करून ज्येष्ठ कवी - कवयित्रींना,ज्येष्ठ समिक्षकांना व वाचकांना दखल घेण्यास भाग पाडले आहे. महाराष्ट्र राज्यातील अत्यंत सन्मानाचा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, कुसुमाग्रज अध्यासनातर्फे देण्यात येणारा 'विशाखा काव्य पुरस्कार ' तसेच वाङ्मय चर्चा मंडळ, बेळगाव (कर्नाटक) यांचा 'कविवर्य कृ.भ.निकुंभ काव्य पुरस्कार ' 'युद्ध पेटले आहे ' कवितासंग्रहास यापूर्वी प्रदान करण्यात आला आहे.

इंदौर येथील पुरस्कार वितरणाच्या समारोहात बाळासाहेब नागरगोजे यांनी बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विखुरलेल्या ऊसतोड कामगारांच्या व्यथा वेदनांचा लेखाजोखा मांडला तेंव्हा इंदौरमधील श्रोते भावूक झाले. ऊसतोडणीच्या कामात परवा अपघातात दुर्दैवी मृत्यू आलेल्या बीड जिल्ह्यातील सोनाली फड, फुलचंद गायकवाड आणि हनुमंत रामभाऊ पाळवदे यांचाही कवी बाळासाहेब नागरगोजे यांनी इंदौर येथील कार्यक्रमात व्यासपीठावरून उल्लेख करून 'अजून किती निरापराध ऊसतोड कामगारांचे बळी ही व्यवस्था घेणार आहे? ' असा सवालही त्यांनी केला. कविवर्य वसंत राशिनकर यांनी ' आपले वाचनालय ' संस्थेच्या माध्यमातून इंदौरमध्ये राबविलेले विविध साहित्यविषयक व शैक्षणिक उपक्रम, मराठी भाषेचे संवर्धन व त्यांच्या साहित्याचा तसेच शिल्पकलेचा श्री. नागरगोजे यांनी सन्मानपूर्वक उल्लेख केला. कविवर्य वसंत राशिनकर यांनी कुसुमाग्रज आणि कवी अनिल यांच्याबरोबर निमंत्रित कवी म्हणून साहित्य सेवा केल्याचा नागरगोजे यांनी आवर्जुन उल्लेख केला. सदरील कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष श्री. मिलिंद दिघे, मुख्य अतिथी डॉ. विकास दवे (निदेशक, मध्य प्रदेश साहित्य अकादमी), श्री.सदाशिव कौतुक व ज्येष्ठ साहित्यिक व रेखाचित्रकार संदिप राशिनकर, सौ. प्रतिक्षा नागरगोजे,कु. प्रेरणा व कु. मृणालिनी नागरगोजे उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन ज्येष्ठ कवयित्री श्रीम. श्रीति राशिनकर व कविसंमेलनाचे सूत्रसंचालन श्री. दीपक देशपांडे यांनी केले. तसेच कार्यक्रमास देशभरातील साहित्यिक व इंदौरमधील साहित्यप्रेमी श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी

npghansawangi@gmail.com

जा.क्रं.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- २०४४

PHno ०२४८३-२७१७८७ दिनांक:-२७ १०/२०२५

-: जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार दिपक विठ्ठल पवार रा. राजेगांव ता. घनसावंगी जि.जालना यांनी नामे चंद्रकांत प्रभाकर विखे रा. देवनगर ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १७८९ दि. ०५/०६/२०२५ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं २६६० दिनांक:- १५/०९/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. चंद्रकांत प्रभाकर विखे रा. देवनगर ता. घनसावंगी जि.जालना नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १७१०/१७ मधील क्षेत्र १२३.४७ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु : सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- राजेगांव रोड

पश्चिम :- बाबासाहेब माणिकराव कदम यांची जागा

दक्षिण :- मायावती शिध्दोधन पटेकर यांची जागा

उत्तरेस :- कल्याण मच्छिंद्र राऊत यांची जागा

या वरील चतुःसिमा मधील १२३.४७ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
मुख्याधिकारी
नगरपंचायत घनसांवगी

कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी

npghansawangi@gmail.com

जा.क्र.२०२६/नपघ/ जा.प्र./कावी- १११९

PHno ०२४८३-२७१७८७ दिनांक:-०२/११/२०२६

-: जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार १. ज्ञानेश्वर पिराजी कुहिरे २. यमुना ज्ञानेश्वर कुहिरे रा. ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे अंकुश बाबुराव नन्नवरे रा.ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं. ३३६४ दि. २३/१०/२०२६ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. १४८७ दिनांक:-०२/११/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. अंकुश बाबुराव नन्नवरे रा.ता. घनसावंगी जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. (२०८) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १६८२/२७ मधील क्षेत्र १०० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु : सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- देवस्थानची जागा

पश्चिमेस :- १५ फुट रुंदीचा अंतर्गत रस्ता

दक्षिणेस :- मुक्ताराम धांडगे यांचा प्लॉट

उत्तरेस :- राधाकिसन पांडुरंग शेळके व कैलास पांडुरंग शेळके यांचा प्लॉट

या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र १०० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर / आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
मुख्याधिकारी
नगरपंचायत घनसांवगी

कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी

npghansawangi@gmail.com

PHno०२४८३-२७१७८७

जा.क्रं.२०२६/नपघ/जा.प्र./कावी- १०९४

दिनांक:- २९/१०/२०२६

-: जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार १. रनजित आसाराम सोळंके २. अजित आसाराम सोळंके रा.ता.घनसावंगी जि.जालना यांनी नामे मिनाबाई अंकुश सोळंके रा. ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं. ३४८७ दि. ०२/०६/२०२६ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. १४३४ दिनांक:- २६/१०/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. मिनाबाई अंकुश सोळंके रा.ता.घनसावंगी जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं. (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. - ज्याचा मिळकत क्रं. १२६४ मधील क्षेत्र ११२.७० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु : सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- घनसावंगी - मांदळा सरकारी रोड

पश्चिमेस :- सुरेश देशमुख यांची जागा

दक्षिणेस :- कॉलनी अंतर्गत रोड

उत्तरेस :- गाडेकर सर यांची जागा

या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र ११२.७० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
मुख्याधिकारी
नगरपंचायत घनसांवगी

कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी

npghansawangi@gmail.com

PHno०२४८३-२७१७८७

जा.क्रं.२०२६/नपघ/ जा.प्र./कावी- १०९५

दिनांक:- २९/१०/२०२६

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार कुंदन रावसाहेब पवार रा.ता.घनसावंगी जि.जालना यांनी नामे देविदास मोतीराम राठोड रा. देवनगर ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं. २९२५ दि. १२/०६/२०२६ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. १४३५ दिनांक:- २६/१०/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. देविदास मोतीराम राठोड रा. देवनगर ता. घनसावंगी जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १५३९/३ मधील क्षेत्र ४३०.११ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- घनसावंगी - राजेगांव रोड

पश्चिमेस :- तुकाराम जाधव व लक्षमण जाधव यांची जागा

दक्षिणेस :- मनोहर रामकिसन साळवे यांची जागा

उत्तरेस :- गोरख रावजी सोळंके यांची जागा

या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र ४३०.११ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर / आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
मुख्याधिकारी
नगरपंचायत घनसांवगी

ना. पंकजाताई मुंडे उद्या जालन्यात ; दुष्काळी परिस्थिती, पाणी टंचाईचा घेणार आढावा

४ तारखेला परळीत; ५ ला बीडमध्ये

जालना / बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे उद्या (ता. ०३) जालना दौऱ्यावर असून शहर व जिल्ह्यातील पाणी टंचाई तसेच दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाची बैठक घेणार आहेत. ४ नोव्हेंबर रोजी परळीत तर ५ तारखेला त्या बीडमध्ये असणार आहेत, अशी माहिती त्यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.

ना. पंकजाताई मुंडे यांचा ३ ते ५ नोव्हेंबर दरम्यानचा दौरा पुढील प्रमाणे...मंगळवार ३ नोव्हेंबर रोजी त्या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून सकाळी १०.३० वा. शिंदे सिल्क इंडस्ट्रीजला भेट, ११.३० वा. जालना महानगरपालिके च्या हुतात्मा स्मारक, टाऊन हॉल, ग्लो गार्डन व नेहरू उद्यानाचे भूमिपूजन त्यानंतर दुपारी १२.३० वा जालना महानगरपालिके तील विविध विकासकामांचा आढावा व पाणीटंचाई संदर्भात बैठक, दुपारी २.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालयात जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती व पाणीटंचाईचा आढावा घेतल्यानंतर जिल्हा रेशीम कार्यालय येथे रेशीम कोष बाजारपेठेला त्या भेट देणार आहेत. बुधवारी, ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत परळी, माजलगाव व केज तालुक्यांतील अभ्यागतांच्या भेटीसाठी वेळ राखीव ठेवण्यात आला आहे. या भेटी शासकीय विश्रामगृह, छत्रपती शिवाजी महाराज चौक, परळी वैजनाथ येथे होणार आहेत. गुरुवारी, ५ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वा. अंबाजोगाई येथे डॉ. नवनाथ घुगे यांच्या 'घुगे हार्ट अँड केअर हॉस्पिटल'चे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर दुपारी १२.३० वा. बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती व पाणीटंचाईचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक होईल. दुपारी १.४० वा. बीड येथे जनसंपर्क कार्यालयात त्या अभ्यागतांच्या भेटीसाठी उपलब्ध असणार आहेत.


दैनिक
राज्य लोकतंत्र
मंगळवार दि.०३ नोव्हेंबर २०२६ | ६

दुष्काळात नागरिकांना पिण्यासाठी पाणी मिळेना

पैठण येथील प्रतिष्ठित शेतकऱ्याने पाणी चोरून जोपासला १० एकर ऊस!

युसूफवडगाव । प्रतिनिधी

एकीकडे दुष्काळामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावेब लागत आहे, तर दुसरीकडे केज तालुक्यातील पाथरा शिवारात पैठण येथील एका प्रतिष्ठित शेतकऱ्याने अंबाजोगाई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीतील पाणी अनधिकृतपणे घेतल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. जलवाहिनीच्या जोडणीवरील नट-बोल्ट सैल करून पाणी घेतले जात असून, याच पाण्यावर चक्क आठ ते दहा एकर ऊस जोपासल्याचे सांगण्यात येत आहे. मग नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यावर डल्ला मारणाऱ्या या प्रतिष्ठित शेतकऱ्यावर कारवाई कधी होणार?



असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. धनेगाव येथील मांजरा धरणातून अंबाजोगाई शहराला पाणीपुरवठा केला जातो. त्यासाठी विशेष जलवाहिनी टाकण्यात आली आहे. या जलवाहिनीवर काही ठिकाणी पाणीगळती होत असून, काही ठिकाणी व्हॉल्व्ह किंवा जोडण्यांशी छेडछाड करून पाणी वळवले जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत.

पाथरा शिवारात शेतजमीन असलेल्या पैठण येथील एका प्रतिष्ठित शेतकऱ्याच्या शेताच्या कडेने अंबाजोगाईची ही जलवाहिनी गेली आहे. संबंधित शेतकऱ्याने स्वतःच्या शेतालगत असलेल्या जलवाहिनीच्या जॉइंटवरील नट-बोल्ट सैल करून तेथून पाणी घेतल्याचा आरोप आहे. या ठिकाणाहून बाहेर पडणारे पाणी चार ते पाच इंची पाइपलाइनद्वारे विहिरीत साठवले जात असल्याचे सांगण्यात येते. विशेष म्हणजे, या पाण्याच्या जोरावर संबंधित शेतकऱ्याने थोडाथोडका नव्हे तर तब्बल आठ ते दहा एकर ऊस जोपासल्याचा आरोप होत आहे. दुसरीकडे अंबाजोगाईकरांना मात्र पिण्याच्या पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे हा प्रकार गेल्या सात ते आठ वर्षांपासून सुरू असल्याचा आरोप आहे.

मुख्याधिकाऱ्यांनी आता तरी लक्ष घालावे!

अंबाजोगाई नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन पाथरा शिवारातील संबंधित जलवाहिनीची प्रत्यक्ष पाहणी करावी. पाणी चोरीच्या आरोपाची निष्पक्ष चौकशी करून अनधिकृत जोडणी किंवा छेडछाड आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. तसेच जलवाहिनीतील पाणीगळती आणि अनधिकृत पाणीवापर तातडीने बंद करून अंबाजोगाईकरांच्या हक्काचे पाणी नागरिकांपर्यंत पोहोचवावे. बनागरिकांना पिण्यासाठी पाणी नाही आणि दुसरीकडे प्रतिष्ठित शेतकऱ्याच्या शेतात १० एकर ऊस हिरवागार! मग प्रशासनाचा कारभार नेमका कोणासाठी? पाण्याची चोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी आणखी किती दिवस वाट पाहावी लागणार?

सौताडा येथील रामेश्वर तीर्थक्षेत्रातील 'रामाचा घोडा' बिबट्याच्या हल्ल्यात ठार!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सौताडा येथील प्रसिद्ध श्री क्षेत्र रामेश्वर तीर्थस्थळाशी संबंधित असलेल्या 'रामाच्या घोड्या'चा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज उघडकीस आली. या घटनेमुळे सौताडा, भुरेवाडी, घुलेवाडी आणि परिसरातील गावांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

सौताडा येथील श्री क्षेत्र रामेश्वर येथे प्रभू श्रीराम यांचा घोडा म्हणून प्रसिद्ध असलेला हा घोडा अनेक वर्षांपासून परिसरातील नागरिकांच्या श्रद्धेचा विषय होता. भुरेवाडी येथील रामभक्त अर्जुन शेंबडे हे वर्षानुवर्षे या घोड्याचा सांभाळ करत होते. भूरेवाडी परिसरात मुक्तपणे फिरून आपले पोट भरणाऱ्या या घोड्याची सौताडा, भुरेवाडी आणि घुलेवाडी येथील ग्रामस्थ मिळून काळजी घेत होते.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असून पाण्याची कमतरता आणि शेतांमध्ये पीक नसल्याने हा घोडा भुरेवाडी गावाजवळील डोंगराळ रानात चरण्यासाठी जात होता. आज सकाळी नेहमीप्रमाणे घोडा रानात गेल्यानंतर भुरेवाडी येथील काही ग्रामस्थ त्याला पाहण्यासाठी गेले असता, बिबट्याच्या हल्ल्यात जखमी होऊन त्याचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले.

'रामाचा घोडा' म्हणून ओळखला जाणारा हा घोडा परिसरातील सर्व गावकऱ्यांना प्रिय होता. ग्रामस्थ मोठ्या

◀◀ पान ३ वर



सहा वर्षांपासून वेतन थकल्याने सफाई कर्मचाऱ्यावर उपासमारीची वेळ!

थकीत वेतनासाठी शेषराव शिंदे यांचे माजलगाव नगर परिषदेसमोर आमरण उपोषण सुरू

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव नगर परिषद अंतर्गत बडारनगर येथील सार्वजनिक शौचालयात सफाई कामगार म्हणून कार्यरत असलेल्या शेषराव रामभाऊ शिंदे यांचे फेब्रुवारी २०२० पासून सप्टेंबर २०२६ पर्यंतचे वेतन अद्याप मिळाले नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. वारंवार निवेदने देऊनही वेतन मिळत नसल्याने अखेर त्यांनी सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ पासून माजलगाव नगर परिषदेसमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

शेषराव शिंदे यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद माजलगाव यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ते बडारनगर येथील सार्वजनिक शौचालयात सफाई कामगार म्हणून कार्यरत आहेत. मात्र, फेब्रुवारी २०२० पासून सप्टेंबर २०२६ पर्यंतचे वेतन त्यांना अदा करण्यात आलेले नाही. यासंदर्भात त्यांनी यापूर्वी अनेक वेळा लेखी निवेदने देऊनही त्यांच्या मागणीची दखल घेण्यात आलेली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून वेतन मिळत नसल्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले असून आर्थिक

◀◀ पान ३ वर



बीड जिल्ह्यात बांधकाम कामगारांसाठी महत्त्वाची बातमी

अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत सद्यस्थितीत कोणतीही नवीन आर्थिक सहाय्य विशेष योजना सुरू करण्यात आलेली नाही, अशी माहिती सरकारी कामगार अधिकारी, बीड यांनी दिली आहे.

सध्याच्या दुष्काळी परिस्थितीचा गैरफायदा घेऊन काही एजंट, दलाल किंवा त्रयस्थ व्यक्तींकडून मंडळाच्या नावाचा गैरवापर करून बांधकाम कामगारांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखवले जाण्याची शक्यता आहे. अशा प्रलोभनांमुळे कामगारांची आर्थिक फसवणूक होऊ शकते, त्यामुळे जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत बांधकाम कामगारांनी सतर्क राहणे आवश्यक आहे.

मंडळाच्या नावाखाली कोणत्याही एजंट, दलाल किंवा त्रयस्थ व्यक्तीशी कोणतेही आर्थिक व्यवहार करू नयेत. कोणत्याही योजनेचा लाभ मिळवून देण्याच्या खोट्या आमिषांना कामगारांनी बळी पडू नये. मंडळाच्या योजनांसंदर्भातील माहिती केवळ अधिकृत शासकीय माध्यमांतून किंवा संबंधित कार्यालयामार्फतच खातरजमा करून घ्यावी. दुष्काळी परिस्थितीत मंडळामार्फत कोणतीही विशेष आर्थिक सहाय्य योजना जाहीर करण्यात आलेली नाही. तरी बीड जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत बांधकाम कामगारांनी कोणत्याही अफवा किंवा अनधिकृत व्यक्तींच्या आश्वासनांवर विश्वास न ठेवता संभाव्य आर्थिक फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण करावे, असे आवाहन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

बीडमध्ये होणारा वीजेचा लपंडाव कायमस्वरुपी थांबणार

आ. संदीप क्षीरसागर, माजी आ.सयद सलीम यांच्या प्रयत्नातून २ सबस्टेशन १३२ लाईनवरून २२० केव्ही लाईनवर

बीड । प्रतिनिधी

शहरात गेल्या काही महिन्यांपासून ट्रीप होऊन वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढले होते. तसा हा प्रश्न अनेक वर्षांपासूनचा आहे, मात्र अलिकडे वारंवार ट्रीप होऊन लाईट जाऊ लागली होती. बीड शहरातील वीजेचा लपंडाव कायमस्वरूपी बंद होऊन नियमित वीजपुरवठा करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांचा निरंतर पाठपुरावा सुरू होता. त्याला यश आले असून बीड शहरातील माळीवेस सबस्टेशन आणि जालना रोड सबस्टेशन हे दोन सबस्टेशन सोमवारी (दि.२) रोजी नवीन झालेल्या २२० के.व्ही.लाईनला जोडण्यात आले आहे. याचा आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांनी शुभारंभ केला.

१३२ के.व्ही. च्या जुन्या लाईनवरून बीड शहरासह ग्रामीण भागातील

◀◀ पान ३ वर

पुढील २५-३० वर्षांच्या अनुषंगाने परिपूर्ण व्यवस्था

बीड शहराची वाढती लोकसंख्या आणि त्यातून वाढणारी वीजेची गरज भागविण्यासाठी झालेले हे काम पुढील २५-३० वर्षांसाठी परिपूर्ण योजना ठरणार आहे. नवीन २२० के.व्ही. च्या लाईनमुळे बीड शहराची पुढील २५ ते ३० वर्षे वीजेची गरज भागणार आहे. त्यामुळे हे काम अतिशय महत्वाकांक्षी असून ते पूर्ण झाले आहे.



कृषी अधिकारी कार्यालय येथे कारभाराचा बोजवारा

सोमवारीही अधिकारी गैरहजर, प्रवेशद्वाराला कुलूप अन् पडदा!

पाटोदा । प्रतिनिधी

शेती व शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी शासनाकडून तालुका कृषी कार्यालयांची स्थापना करण्यात आली आहे. मात्र, पाटोदा येथील तालुका कृषी कार्यालयात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या बेजबाबदार कारभारामुळे शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे. आज दिनांक २ नोव्हेंबर रोजी सोमवार असल्यामुळे तालुक्यातील शेतकरी आपली कामे आणि अर्जांसाठी मोठ्या अपेक्षेने कृषी कार्यालयात आले होते. परंतु, कार्यालय गाठल्यावर त्यांना अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराचा प्रत्यय आला.



कुलूप आणि पडद्याचा प्रताप:

आज दुपारी २:२६ च्या सुमारास तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराला कुलूप लावलेले होते. विशेष म्हणजे, अधिकारी केबिनमध्ये आहेत की नाही हे शेतकऱ्यांना समजू नये आणि त्यांची गैरहजेरी लपवता यावी, म्हणून चक्क दरवाजाला पडदा टाकण्यात आला असल्याचे समोर आले आहे.

शेतकऱ्यांचे हाल:

सोमवारचा दिवस हा प्रशासकीय कामांसाठी महत्त्वाचा मानला जातो. दूरवरून आपल्या शेतीच्या व योजनेच्या कामांसाठी आलेल्या शेतकऱ्यांना कुलूपबंद दारासमोर ताटकळत उभे राहावे लागले. शासनाच्या कृषी योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांच्या अशा बेजबाबदार वागण्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र रोष पसरला आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन संबंधित गैरहजर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी संतप्त शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

दुष्काळात शेतकऱ्यांना मदतीसाठी पतसंस्थेचा पुढाकार; सभासदांना दिवाळी लाभांश वाटप

चेअरमन डॉ. विलास सोनवणे यांची माहिती; ३४ वर्षांची लाभांश वाटपाची परंपरा कायम

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी : यंदाच्या दुष्काळाची गंभीर परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांना संस्थेच्या माध्यमातून मदत करण्याचा विचार सुरू असून, यासाठी सर्व संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. सभासदांनीही याबाबत सूचना कराव्यात. संस्थेच्या उपलब्ध निधीतून निश्चितच मदत करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी माहिती माजी आमदार निवृत्तीराव उगले नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन डॉ. विलास सोनवणे यांनी दिली.



आष्टी शहरातील माजी आमदार निवृत्तीराव उगले नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता संस्थेच्या कार्यालयात सभासदांना दिवाळीनिमित्त लाभांश वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानावरून

◀◀ पान ३ वर

शेतकऱ्यांच्या पाठीशी महेश कारखाना सदैव उभा राहील; भीमराव धोंडे यांची ग्वाही

२०२६-२७ च्या गळीत हंगामाचा शुभारंभ; शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहणार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील महेश सहकारी साखर कारखाना हा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या पाठीशी सदैव उभा राहील. या कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात आला असून, भविष्यातही शेतकरी आणि मतदारसंघातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले. महेश सहकारी साखर कारखाना, कडा येथे सन २०२६-२७ च्या गळीत हंगामाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार बाळासाहेब अजबे, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, राष्ट्रवादी काँग्रेसचे आष्टी तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, कारखान्याचे चेअरमन डॉ. अजय धोंडे, व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, राजेंद्र धोंडे, अभय राजे धोंडे, आरपीआयचे आष्टी तालुकाध्यक्ष अशोक साळवे, माजी जिल्हा परिषद सदस्य दशरथ वनवे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

गळीत हंगामाच्या शुभारंभानिमित्त उपस्थित मान्यवरांनी सहकार क्षेत्र, साखर उद्योग आणि शेतकऱ्यांसमोरील प्रश्नांवर मार्गदर्शन केले. कारखाना सुरळीत आणि यशस्वीपणे चालविण्यासाठी शेतकरी, सभासद, कामगार आणि संबंधित घटकांनी एकत्रितपणे सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी रामराव खेडकर, पांडुरंग नागरगोजे, नियामत बेग, सतीश शिंदे, अण्णासाहेब चौधरी, सुदाम झिंजुर्के, परमेश्वर शेळके, हरिभाऊ जंजिरे, भाऊसाहेब घुले, राहुल काकडे, काकासाहेब लांबरुड, सुरेश राख, राजपाल शेंडगे, वैभव बडे, त्रिंबक इथापे, संतोष जाधव, बापूसाहेब शिंदे, बाळासाहेब शिंदे, शेख आज्जू, शेख नईम, ॲड. रिजवान शेख यांच्यासह कारखान्याचे संचालक मंडळ, शेतकरी, ऊसतोड मुकादम, वाहतूकदार, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कारखाना यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे

महेश सहकारी साखर कारखाना सुरळीत आणि यशस्वीपणे चालविण्यासाठी सर्व घटकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. शेतकरी, सभासद

◀◀ पान ३ वर

बीड एसटी महामंडळात शिकाऊ उमेदवारांची भरती सुरू

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बीड विभागीय कार्यालयांतर्गत सन २०२६-२७ या सत्रासाठी विविध व्यवसायांमध्ये शिकाऊ उमेदवार () निवडीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

मान्यताप्राप्त मधून विविध व्यवसायांमध्ये उत्तीर्ण झालेले उमेदवार या भरतीसाठी पात्र असतील. केंद्र शासनाच्या . या .. पोर्टलवर शिकाऊ उमेदवार भरतीची कार्यवाही प्रथम ऑफलाईन पद्धतीने आणि नंतर ऑनलाईन पद्धतीने केली जाणार आहे. शिकाऊ उमेदवारांसाठी भरावयाच्या जागा, विद्यावेतन, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा आणि अर्ज करण्याची शेवटची तारीख यांसारख्या अटी व शर्तींची सविस्तर माहिती वरील अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी जास्तीत जास्त उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा. असे,आवाहन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभाग नियंत्रक राज्य परिवहन, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र. ०२४४२-२२२५८० यावर संपर्क साधावा.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26